MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक ४ / एप्रिल २०१३

## संपादकीय

### संस्कृती भंजन की वर्धन?

दिल्लीपासून गल्लीपर्यंत सद्या गाजत असलेल्या बलात्काराच्या घटना काय किंवा लोकप्रतिनिधींच्या अधिकारांच्या गैरवापराच्या कथा काय या सगळ्या गोष्टींचा केंद्रबिंदू हा 'माणूस'च आहे. बाराव्या शतकापासून युरोपमध्ये प्रबोधनाचे वारे वाहू लागले. पाचव्या सहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत इराण आणि इराकमध्ये मोठ्या प्रमाणवरती विज्ञान आणि मानव्य शास्त्रांच्या ज्ञानशाखांमध्ये वाढ झाली. ही समृद्धता प्रामुख्याने ग्रीक आणि भारतीय तत्वज्ञानाच्या मिश्रणातून आली होती. पाचव्या शतकात इराणमधील गुंडिशापूरला असे ज्ञानपीठ प्रस्थापित झाले. भारतातील अनेक वैद्यकीय, ग्रहगणित आणि इतर वैज्ञानिक शास्त्रांचे ग्रंथ तेथे पेहलवी भाषेत भाषांतरित होऊ लागले. पंचतंत्रातील कथांपासून चतुरंग (बुद्धिबळ) हा खेळ याच काळात तेथे संक्रमित झाला. ॲरिस्टॉटल, प्लेटो आणि इतर अनेक ग्रीक तत्ववेत्त्यांच्या ग्रंथांचीही येथे भाषांतरे होऊ लागली. दोन तीनशे वर्षांत हेच ज्ञानकेंद्र ८ व्या ९ व्या शतकात बगदाद येथे स्थलांतरित झाले. तेथेही भारतीय तत्त्वज्ञान, गणित व विज्ञानाच्या अनेक ग्रंथांची भाषांतरे सुरू झाली. मध्यपूर्व देशांतील अभ्यासकांनी यात मौलिक भर टाकून या विज्ञानशाखा विकसित केल्या. याचवेळी युरोपमध्ये ख्रिस्ती आणि इस्लामी धर्मयुद्धे होत होती. इस्लाममध्ये धर्मांधतेचा प्रसार वाढत होता; तर ख्रिस्ती प्रदेशांतून ज्ञानलालसा वाढत होती.

वर उल्लेख केलेल्या बाराव्या शतकापासून पर्शियन व अरेबिक भाषांतील हे ज्ञानभांडार लॅटिन भाषेत भाषांतरित होऊ लागले आणि त्याचा पुढचा टप्पा म्हणून १५-१६ व्या शतकात विशेषतः पश्चिम युरोपमध्ये प्रबोधन युगाला सुरुवात झाली. यामुळेच चर्च, तसेच ख्रिस्ती धर्म संकल्पनेच्या आंधळ्या प्रभावाला धक्के बसू लागले. चर्च व राजसत्ता यांतही संघर्ष वाढू लागले. या प्रबोधन युगाचे पुढचे पाऊल म्हणजेच युरोपमधील औद्योगिक क्रांती.

या औद्योगिक क्रांतीने मात्र व्यक्ती आणि समाज यांची सगळी समीकरणे बदलून टाकली. या औद्योगिकीकरणाचा व्यापारी आणि आर्थिक पूरकत्वाचा फायदा अमेरिका या नवीन उदयाला येणाऱ्या देशाने सर्वाधिक घेतला. युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, बेल्जियम, स्पेन, पोर्तुगाल यांच्या सोळा सतराव्या शतकात चालू झालेल्या वसाहतवादालाही या घटना पोषकच ठरल्या. ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि औद्योगिक क्रांतीचे फायदे ही दोन शस्त्रे घेऊन आशिया, आफ्रिका आणि द. अमेरिका खंड युरोपियन संस्कृतीने पादाक्रांत केले. आधुनिकता, प्रगती आणि विज्ञान, म्हणजेच पाश्चिमात्य जीवनशैली आणि संस्कृती हे समीकरण मांडले जाऊ लागले व आज ते दृढ झालेलेही आपल्याला दिसते. पौर्वात्य संस्कृती म्हणजे

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

परंपरावादी, असंस्कृत, मागासलेले, अंधश्रद्धाळू हेही समीकरण यामुळेच पक्के झाले.

भारत देश आणि भारतीय संस्कृती यांच्या विकासाचा काळ हा कमीत कमी पाच हजार वर्षे तरी अभ्यासकांना आज मान्य आहे. भारतीय संस्कृतीच्या निर्मितीमध्ये– मग तो धर्म, कला, विज्ञान वा तत्त्वज्ञान असो या हजारो वर्षांचे संचित साठलेले आहे. यातूनच भारतीय जीवनशैली विकसित झाली. यात अनेक चढउतार, यश–अपयश, चांगल्या वाईट गोष्टींचे अनुभव समाविष्ट आहेत आणि यामुळेच कदाचित भारतीयांमधील अनेक विभिन्न धर्म समजुती, आचारविचारांमधील वैविध्य यांचा उगम आहे. याचे आकलन पाश्चात्य धर्मप्रसारक आणि अभ्यासकांना होऊ शकले नाही. एक देव, एक पुस्तक आणि एकच विचारसरणी हा गाभा असलेल्या ख्रिस्ती आणि इस्लामी प्रभावाखालील पाश्चात्य, हिंदूंचा एकच ग्रंथ नाही, किंवा अनेक देव आणि अनेक पंथ ही संकल्पना पचवू शकले नाहीत. हजारो वर्षे भारतीय संस्कृती या विविधतेतूनच विकसित झाली. त्यांनी आपले अध्यात्म आणि विज्ञान यांची निर्मिती केली आणि कधी धर्मग्रंथ तर कधी सांस्कृतिक बंधने, नीती अनिती व पापपुण्य, चांगल्याला प्रोत्साहन, पुरस्कार तर अविवेकी वर्तणुकीला लगाम आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळू न देणे यांतूनच व्यक्ती विकास, समाजविकास आणि त्यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न केला. याकरता त्यांना केव्हाच फक्त एका देवाची, एका पुस्तकाची, एका नेत्याची किंवा फक्त एका विचाराची बांधीलकी किंवा गुलामगिरी स्वीकारावी लागली नाही. आर्यभट, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य यांच्या गणिती मांडणीतही त्यामुळेच विविधता दिसते, मतभेद दिसतात आणि यामुळेच नृत्याचे मणिपुरीपासून भरतनाट्यम्, कथकलीपर्यंत भिन्न नृत्यशैली विकसित होतात. शंकराचार्यांपासून मध्वाचार्यांपर्यंत सर्व आचार्य संपूर्णतः भिन्न तत्त्वज्ञानाचा विचार मांडू शकतात. या कोणालाच काय पण वात्सायनालाही कुठलाही धर्मगुरू धर्मबाह्य करू शकला नाही. १९ व्या शतकात इंग्रजीत वात्सायनाचे भाषांतर करणाऱ्या लेखकांना मात्र भीतीपोटी आपल्या संपूर्ण नावाची फक्त आद्याक्षरे लिहावी लागली.

इतिहासातील वरील घटनांचा मागोवा घेतल्यावरच आजच्या पाश्चात्य संस्कृती आणि जीवनशैलीचे स्त्रोत आपल्या लक्षात येतात. यंत्रयुगाने त्यांचे राहणीमान, माणसांमाणसांमधील आणि निसर्गामधील संबंध यांमध्ये आमूलाग्र बदल केला. यंत्र निर्मितीची साधने, त्यातून निर्माण होणारे उत्पादन आणि वितरण यांनी एका वेगळ्या अर्थकारणाला जन्म दिला. सभ्यतांच्या विकासाचे परिमाण हे परडोई साबण, मोटारी आणि इतर उपभोग्य वस्तूंशी निगडित केले गेले. वस्तूंची विक्री जेवढी जास्त तेवढे उत्पादन जास्त आणि उद्योगधंद्यांची समृद्धी ही जास्त. विज्ञान दररोज क्रांतिकारी गोष्टींची उपलब्धता करुन देते. यातूनच उद्योगधंद्याच्या गुणात्मक आणि संख्यात्मक वाढीकरता जीवघेण्या स्पर्धेचा जन्म झाला. उद्योगापासून खेळापर्यंत 'यश' हे एकच यशस्वितेचे मोजमाप बनले. यामुळेच सर्व नीती–नियम, सामाजिक, सांस्कृतिक, बंधने खिळखिळीच नाही तर त्यांची मोडतोड चालू झाली. आजच्या क्रिकेटचे शुद्ध व्यापारी स्वरूप काय किंवा यशाकरता खेळाडूंचे मादक पदार्थांचे सेवन काय याचा उगम ही याचे अर्थकारण आणि स्पर्धा यातच आहे. दुर्दैवाने पाश्चात्य जगतात प्रबोधन आणि यंत्र युगातून आलेली स्वच्छता, वक्तशीरपणा, कायद्याचा आणि ज्ञानाचा आदर आणि या करता लागणारी साधने म्हणजे अद्यावत ग्रंथालय, संग्रहालये आणि विद्यापीठे मात्र आम्ही निर्माण करु शकलो नाही.

सोळावे शतक म्हणजे वसाहतवादाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत तत्वज्ञान, विज्ञान, जीवनोपयोगी उत्पादने, संगीत आणि कला या सर्व क्षेत्रांमध्ये भारत हा पाश्चात्य देशांच्या पुढे होता. यांच्या निर्मितीकरता लागणारी समाजरचना ही स्पर्धेपेक्षा सामंजस्य, सद्सद्विवेक बुद्धी आणि सर्वमान्य नीती–अनिती आणि सामाजिक मूल्यांचा आदर करुन जिवंत राहिली. चारित्र्यनिर्मिती आणि जीवनात यश निर्मिती करता लागणाऱ्या साधनांची सांगड होती. येन केन प्रकाराने यश मिळवणे समाजमान्य नव्हते.

यामुळेच पाश्चत्त्य आणि भारतीय जीवनशैली आणि सांस्कृतिक मूल्ये,' यांचा स्त्रोत आणि अंतिम ध्येय ही

वर्ष चौदावे/अंक ४/एप्रिल २०१३

वर्ष चौदावे/अंक ४/एप्रिल २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक १० वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय तिसरा<br>विषय : कर्मयोग विचार | कै. शं. बा. मठ | ३ |
| ३) | ग्रामीण भागांत पूर्वी घडलेली एक<br>चढाओढ कथा | कै. मा. ना. पाटील | ९ |
| ४) | जीनान : एक औद्यागिक शहर | डॉ. सुधाकर आगरकर | ११ |
| ५) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल - साधना | श्री. यशवंत साने | १४ |
| ६) | जागतिक महिला दिनानिमित्त ... | सौ. स्वाती भालेराव | १८ |
| ७) | रामचरित मानस | प्राचार्य सी. श्री. मुजुमदार | २२ |
| ८) | आता तरी जाग येईल का? | श्री. महेश पाटील | २६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर<br>कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२<br>या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय तिसरा
## विषय : कर्मयोग विचार

*शंकरराव मठांचे निधन हा मोठा धक्का होता. दिशाचे ते महत्त्वाचे आधारस्तंभ होते. गीते वरील संपूर्ण लेखमाला त्यांनी आमच्याकडे दिली होती. त्यांतील पुढचे लेख देत आहोत.*

**श्लोक १ ते ८ ज्ञानयोग व कर्मयोग – त्याची श्रेष्ठता**

अर्जुनाची शंका – तो म्हणतो – हे जनार्दना कर्मापेक्षा समबुद्धी श्रेष्ठ आहे असे जर तुझे म्हणणे आहे तर केशवा मला या घोर कर्मात का बरे लोटतोस? अशा दुटप्पी भाषणाने माझ्या बुद्धीला गोंधळून टाकतोस. तर माझे कल्याण होईल असा एकच निश्चित मार्ग मला सांग. यावर श्रीकृष्ण म्हणतो हे निष्पाप अर्जुना या लोकी सांख्य ज्ञानयोगाने व योगमार्गी कर्मयोगाचे भिन्न आचरण करतात, असे हे दोन मार्ग आहेत. केवळ कर्म न करण्याने मनुष्याला निष्कामता केल्याचा लाभ होत नाही. इतकेच नव्हे कर्माचा त्याग करण्याने मनुष्य सिद्धी मिळवू शकतो असेही नाही. दुसरे असे की कर्म न करता कोणीही क्षणभर देखील राहू शकत नाही. प्रकृतीचे गुण सर्वांनाच अदृश करून त्यांच्याकडून कर्म करवून घेतात. जो आग्रहपूर्वक कर्मेंद्रिये आवरून मनाने मात्र भोगांचेच स्मरण करीत असतो, त्या अज्ञानी माणसाला मिथ्याचारी म्हणावे. थोडक्यात तो दांभिक होय. हे अर्जुना, जो मनुष्य मनाने इंद्रियांना ताब्यात ठेवतो व हेतू विरहित मनाने कर्म करतो तो श्रेष्ठ होय. यालाच कर्मयोग असे म्हणतात. म्हणून तू विहित कर्मे कर. कर्म न करणे हे कनिष्ठ आहे यामुळे तुझा शरीराचा निर्वाहदेखील अशाने होणार नाही.

**श्लोक ९ ते १६ यज्ञ विषयक कर्म करण्याचे महत्व**

अर्जुना, यज्ञ म्हणून केलेल्या कर्माशिवाय इतर कर्मामुळे मनुष्य बंधनात अडकतो. म्हणून निरपेक्ष वृत्तीने यज्ञ म्हणून कर्म कर. सृष्टीच्या आरंभीच प्रजापतीने यज्ञासह प्रजा उत्पन्न केली. या यज्ञाने तुमची भरभराट होवो यांनी तुमच्या इच्छा पूर्ण होवोत असेही म्हटले. या यज्ञाने तुम्ही देवांना संतुष्ट करा व ते देव तुम्हांला संतुष्ट करतील असा परस्पर विनिमय करून तुम्ही सर्व आत्यंतिक कल्याण प्राप्त करून घ्या. यज्ञाने संतुष्ट झालेले देव प्रसन्न होऊन तुमचे इच्छित देतील. मात्र देवांनी दिलेल्या वस्तुंपैकी त्याना काहीही न देता स्वतःच त्याचा उपभोग घेणारा माणूस चोर ठरतो. यज्ञ करून उरलेल्या भागाचा उपभोग घेणारे सज्जन सर्व पापासून मुक्त होतात. पण जे स्वतःसाठीच उपभोग घेतात ते पापी होत व ते पापच सेवन करतात असे म्हणावे. हे बघ, सर्व प्राणिमात्र अन्नापासून होतात, अन्नाची उत्पत्ती पर्जन्यापासून, पर्जन्य यज्ञापासून, यज्ञ कर्मापासून, कर्म ज्ञानापासून आणि ज्ञान परमात्म्यापासून उत्पन्न होते. म्हणून सर्व व्यापक परमात्मा यज्ञात सदा सर्वदा प्रतिष्ठा पावतो. हे अर्जुना, अशा प्रकारे सुरू केलेले हे यज्ञचक्र जो मनुष्य नेहमी सुरू ठेवत नाही त्या इंद्रिय लंपट मनुष्याचे आयुष्य पापरूप होते व त्यांचे जिणे ही व्यर्थ होते.

**श्लोक १७–२४ ईश्वराप्रीत्यर्थ आणि लोकसंग्रहासाठी ज्ञानी लोकांना कर्म करणे आवश्यक.**

हे अर्जुना जो आत्मतत्वात रमला आहे जो त्याच्यातच तृप्ती प्राप्त करुन घेतो त्याला कोणतेही कर्तव्य शिल्लक राहात नाही. कर्म करण्यात त्याचा कोणताही स्वार्थ नसतो. तसा कर्म न करण्यातही स्वार्थ नसतो इतकेच नव्हे, सर्व प्राणिमात्राशी त्याचा कोणता वैयक्तिक स्वार्थही नसतो. यासाठी तू स्वार्थ रहित होऊन निरंतर कर्तव्य कर्म करीत रहा. अशा मानवालाच परम पद मिळते आणि दुसरे असे की, जनक आदीनांही कर्मानेच सिद्धि प्राप्त झाली. त्याप्रमाणे लोकसंग्रहासाठी तुलाही कर्म करणे योग्य ठरेल. कारण श्रेष्ठ माणसे जसे वागतात तसेच इतर लोकही ते

प्रमाण मानून आचरण करतात. म्हणजे श्रेष्ठांचे अनुकरण करतात. हे अर्जुना मला तिन्ही लोकांत काहीही कर्तव्य उरलेले नाही अथवा काही मिळवावयाचे राहिले नाही. तथापि मी कर्म करीतच आहे. जर मी आळशी बनून कर्म केले नाही तर हे पार्था, लोकही सर्व प्रकारे माझेच अनुकरण करतील. म्हणजे मी कर्म न केले तर हे सर्व लोकही आळशी होतील व मी समाजात संकट निर्माण करणारा होईन. थोडक्यात, प्रजेचा नाश करणारा मी होईन.

**श्लोक २५ ते ३५ ज्ञानी व अज्ञानी यांची लक्षणे. राग द्वेषरहित कर्म करण्याची आवश्यकता.**

हे भारता, अज्ञानी लोक स्वार्थ प्रेरित कर्म करतात. ज्ञानी माणूस लोकसंग्रहासाठी स्वार्थरहित कर्म करणे योग्य मानवी व ज्ञानी माणसाने अज्ञानी माणसाने स्वार्थमूलक कर्मासाठी बुद्धिभेद करू नये. मात्र स्वतः स्वार्थरहित समबुद्धीने आचरण करत इतरांकडूनही सर्व कर्मे करवून घेण्याची उमेद बाळगावी. हे खरे की, सर्व प्रकारची कर्मे प्रकृतीच्या गुणामुळे केली जातात. पण अहंकाराने मोह पावून मानव स्वतःला कर्ता मानतो. पण हे महाबाहो अर्जुना गुणविभाग व कर्म विभाग यांमधील तत्व जाणणारा मनुष्य प्रकृतीचे गुणच एकमेकाशी मिसळून हा बनाव घडवून आणतात हे अनुभवून स्वार्थरहित होतो. प्रकृतीच्या गुणांचे आकलन न झालेले अज्ञानी गुणांद्वारे होत असलेली कर्मे स्वार्थी दृष्टीने पाहतो. त्या अज्ञानी लोकांना ज्ञानी माणसाने यापासून विचलित करू नये. वास्तविक अध्यात्मबुद्धीने सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण करुन आशारहित ममत्वशून्य व शोक संताप रहित होऊन तू कर्म कर, म्हणजे युद्ध कर. जे लोक श्रद्धेने मनाला शंकारहित करून माझ्या मताप्रमाणे नित्य वागतात ते कर्म बंधनातून मुक्त होतात. पण ज्याना यात दोषच आढळतो व जे माझ्या मताप्रमाणे वागणे टाळतात ते ज्ञानापासून वंचित झाल्यामुळे मृत्यू पावतात असे तू जाण. शेवटी ज्ञानी माणूस देखील प्रकृतीच्या अनुरोधानेच व्यवहार करतो. किंबहुना सर्व प्राणी आपआपल्या प्रकृतीप्रमाणेच वागतात. येथे निग्रह काय कामाचा? विषयासंबंधी इंदियांच्या ठिकाणी स्वाभाविकपणेच प्रीती वा द्वेष असतात. मानवाने त्याच्या आधीन होऊ नये. कारण ते शत्रूप्रमाणे वागतात. म्हणून जरी सुखाने आचरण करावयास परधर्म योग्य वाटत असला तरी आपला धर्म कष्टप्रद वाटला तरी तोच अधिक कल्याणकारक असतो. स्वधर्माचे आचरण करताना मरणदेखील पत्करावे परंतु परधर्माचे आचरण करणे अयोग्य व महाभयंकर आहे.

**श्लोक ३६ ते ४३ रजो भूत काम संकल्पाचे निरोधन.**

इतका उपदेश झाला असता अर्जुन कृष्णाला म्हणतो– हे कृष्णा मला हे कळत नाही की कोणाच्या प्रेरणेने मनुष्य इच्छा नसतानाही अवश होऊन पापाचे आचरण करतो? श्रीकृष्ण उत्तर देताना म्हणतो, रजोगुणापासून उत्पन्न झालेला मोठा खादाड व महान पापी असा हा 'काम' आणि क्रोध या उभयताना तू शत्रू समज. ज्याप्रमाणे धुराने अग्नी व धुळीने आरसा आच्छादिला जातो आणि वारेने गर्भ लपेटलेला असतो त्याप्रमाणे या कामाने हे सर्व ज्ञान आच्छादित केले आहे. हे कुंतीपुत्रा अर्जुना, सर्वांचा नित्य वैरी व केव्हाही अतृप्त असणाऱ्या अग्नीसम असलेल्या कामाने ज्ञान झाकले जाते. इंद्रिये मन आणि बुद्धी ही कामाची निवास स्थाने आहेत. या काम यांच्या साहायाने ज्ञानाला आच्छादित करून जीवरूपी आत्म्याला विशेष मोहित करतो. हे भरतश्रेष्ठा यासाठी प्रथमतः तू इंद्रियांचा संयम करून ज्ञान आणि विज्ञान यांचा नाश करणाऱ्या पापी कामाचा त्याग कर. शरीरापेक्षा इंद्रिये श्रेष्ठ आहेत. इंद्रियाहून मन श्रेष्ठ, मनाहून बुद्धिश्रेष्ठ आणि बुद्धीहूनही आत्मा श्रेष्ठ होय. हे महाबाहो अर्जुना आत्म्याला बुद्धीपेक्षाही श्रेष्ठ समजून आपल्या शक्तीने संयमपूर्वक या दुर्जय कामरूपी शत्रूचा नाश कर.

या अध्यायात कर्मयोगाचा विचार केला आहे. कर्म का करावे? कोणते करावे? ते कसे करावे? करण्यायोग्य श्रेष्ठ कर्म कोणते? या गोष्टींचा विचार इथे स्पष्ट करण्यात आला आहे. म्हणून या अध्यायाचे नाव कर्म योग असे ठेवलेले आहे.

जरी सांख्यमतानुसार कर्म गौण पावले गेले आहे तथापि तो तुझा अधिकार असल्यामुळे अर्जुना तुला कर्म करणेच

योग्य आहे असे श्रीकृष्णाने त्याला सांगितले. अर्जुनाच्या मनात शंका उत्पन्न झाली. जर कर्ममार्ग गौण आणि ज्ञानमार्ग श्रेष्ठ आहे तर दोषयुक्त गौण कर्माचे मी आचरण का करावे? ज्ञानमार्गाने ब्राह्मी स्थितीचा आनंद का प्राप्त करू नये? म्हणून अर्जुन कृष्णाला म्हणतो या दोहोपैकी कोणत्या मार्गाने मी जाणे योग्य ते निश्चितपणे मला सांग.

**मनुष्याचे दोन प्रकार –**

या जगात काही लोक ज्ञाननिष्ठ आणि काही कर्मनिष्ठ असतात. तमोगुणी अज्ञानामुळे काहीच करू शकत नाहीत. रजोगुणी खटपट करणारे कर्मनिष्ठ, सत्वगुणी ज्ञानात रमणारे ज्ञाननिष्ठ म्हणून गीता दोनच निष्ठांचा विचार करणे. प्रायः बरेच लोक या दोन वर्गांत वाटले जातात. लौकिक कामधंदा, उद्योग व धानधारणा गूढ तत्त्वांचा विचार या दोन प्रकारच्या कामांत मनुष्य समाज असलेला पाहावयास मिळतो. याप्रमाणे या उभयतांचे मार्ग भिन्न. एकाचे काम दुसऱ्याला जमेलच असे नाही. म्हणून पूर्णपणे एखाद्या ठिकाणी अवस्थान असणे याला निष्ठा असे म्हणतात. 'निःशेषेण स्थानं' मात्र कर्म जो करीत नाही त्याला ज्ञानी म्हणण्याची चूक करू नये. जो कर्मेंद्रिय बाह्यात्कारी आवरतो व मनाने विषयोपभोगासाठी व्याकूळ असतो, त्याला ढोंगी वा मिथ्याचारी म्हणावे. निःशेष कर्म त्याग असंभाव्य आहे. कारण जीवन हेच एक मोठे कर्म आहे. म्हणून, मनाने इंद्रियांचे संयम करून जो कर्म करतो त्याची योग्यता विशेष आहे.

**यज्ञार्थ कर्म –**

सर्व जगाचेच स्थैर्य यज्ञावर अवलंबून आहे. जे लोक स्वतःच्या उदरभरणासाठीच अन्न शिजवून खातात ते पापाचे भागीदार होतात. जे अन्न शिजवून प्रथम त्याचा यज्ञ करतात व शिल्लक राहिलेले तेवढेच अन्न स्वतःच्या उपभोगासाठी सेवन करतात. त्यांची सर्व पापे नाहीशी होतात. स्वतःचे पोट भरणे याचाच अर्थ स्वार्थ. स्वतःच्या सुखासाठी कर्म करणे. लोकहितासाठी कर्म करणे याला परार्थ म्हणतात. ज्यात स्वार्थ व परार्थ साध्य होऊन तो एकरूप होतो त्याला परमार्थ म्हणावे. हे श्रेष्ठ स्वरूपाचे कर्म याचेच नाव यज्ञ होय. यज्ञात 'परस्परं भावयन्तः' आपले सुख व दुसऱ्याचे हित या दोनही गोष्टी साधतात हाच परमार्थ.

**अंतिम सिद्धी**

आत्मरति, आत्मतृप्ती आणि आत्मसंतोष पूर्णपणे सिद्ध होतो. अशावेळी स्वार्थाचा लवलेशही राहात नाही. ही अंतिम स्थिती प्राप्त होईपर्यंत आसक्तिविरहित होऊन कर्म केल्यास ही स्थिती प्राप्त होते. श्रेय परमं अवात्स्यय।

**लोकससंग्रह व परमार्थ**

केवळ स्वार्थ आणि केवळ परार्थ ही सदोष, परमार्थ साधनात आपले आणि सर्वांचे खरे कल्याण आहे. लोक संग्रह याचा अर्थ जनतेची धारणा, जनतेची उन्नती, जगाची सुधारणा, मनुष्य मात्राचे कल्याण, जनतेला सन्मार्गासाठी प्रवृत्त करणे, राष्ट्र रक्षण इत्यादी आहे. हा लोकसंग्रह केवळ स्वार्थ वा परार्थ याने होऊ शकत नाही. परमार्थानेच साधता येतो. यालाच यज्ञ असे म्हणावे. आपण श्रेष्ठ पुरुषांच्या योग्यतेला पोचू शकत नाही. पण त्यांच्या कार्यात निमित्तमात्र होता येणे शक्य आहे. अर्जुन हा इथे निमित्त मात्र आहे. हे ही फार महत्वाचे आहे. यासाठी आपल्या ठिकाणी योग्यता प्राप्त करणे हे प्रत्येक मानवाला आवश्यक आहे.

**कर्तृत्व**

गुणामधे आहे. एकाचे गुण दुसऱ्या गुणाशी युक्त होऊनच ज्ञानाच्या भूमिकेतून कोणताही मनुष्य मीच या कार्याचा कर्ता आहे असे म्हणू शकत नाही. असे म्हणणे हे अज्ञान मूलक घडते. गुणागुणेषु वर्तन्ते। प्रकृतीच्या गुणानीच हे सर्व घडत आहे असे समजून त्यात आसक्त न होणे यातच मनुष्याचे थोरपण आहे.

**ईश्वरार्पण कर्म**

जे ईश्वरार्पण कर्म करतात ते बंधमुक्त होतात. इतकेच नव्हे ते पवित्र होऊ लागतात. परमेश्वराला अर्पण करण्यासाठी मी हे कर्म करीत आहे असा निश्चय होताच मनुष्याच्या हातून हीन कर्मे घडत नाहीत. हीन विचार दूर

पळू लागतात. ईश्वर सर्वत्र आहे. हीन कर्म कुणाशी कुठे संभवणार तो जनतेचा उत्तम सेवक बनून जातो. न्यूनता, पीडा कमी करणे, हेच त्याचे कर्म बनते. पीडितांची सेवा करणे, दुःखी माणसाचे अश्रू पुसणे हीच परमेश्वराची सेवा आहे. साधूचे रक्षण दुर्जनांचे निर्दालन आणि धर्म स्थापना या कार्यासाठी साक्षात् परमात्मा अवतीर्ण होतो. हे लक्षात घेऊन सत् प्रवृत्तीने मनुष्य या कर्मात प्रवृत्त होतो.

**प्रकृति स्वभाव**

मनुष्याचा प्रकृति स्वभाव जन्मापासून विशिष्ट प्रकारचा असतो. त्या स्वभावाला अनरूप कर्मच त्याजकडून चांगल्या प्रकारे होऊ शकते. आपल्या प्रकृति स्वभावानुरुप असलेले कर्म सोडून दिले तर त्याजकडून इतर कर्म चांगल्या प्रकारे होईलच, असे सांगता येत नाही. स्वतःचे कर्म सोडले व इतर कर्म जमत नाही. अशी त्याची परिस्थिती होते. इतर मोहक वाटणारे कर्म शेवटी हानिकारकच. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आपले सहज प्राप्त कर्तव्य कर्म सोडू नये.

**दुर्जय काम**

दुर्जय असणाऱ्या कामाला जिंकण्यासाठी काम करावे? हा काम रजोगुणापासून उत्पन्न होतो. तो अंतःकरणात भोग लालसा निर्माण करतो. त्यामुळे लोक असंख्य पातके करतात व दुःख भोगतात. उपभोगाने कामाची तृप्ती कधीच होत नाही. उन्नती इच्छिणाऱ्या मनुष्याने आपल्या इंद्रियांचा संयम करूनच या दुर्जय कामाला जिंकावे. संयमाचे सामर्थ्य विलक्षण आहे. इंद्रिय, मन, बुद्धी याच्या पलीकडे आत्मशक्ती आहे. हा विचार करून कामाच्या अधीन न होता आत्मवान् व्हावे. अन्यथा मनुष्य दुर्बळ होतो व सहज बळी पडतो. आपल्या मनोनिग्रहामुळे आत्मिक शक्ती प्रबळ होते व दुर्जय कामाला जिंकता येते. जहि शत्रुं महाबाहो कारुपं दुरासदं। सारांश रूपाने या अध्यायात खालील विचार केलेला आहे. संक्षेपाने

१) भोगाचे नियमन, धर्म विचाराने करावे, पापाला प्रवृत्त करणारा काम मनुष्याचा शत्रू आहे. त्याला संयमाने जिंकून आत्मिक सामर्थ्य वाढवावे.

२) अहंकाराचा त्याग करुन प्रकृतीच्या गुणापासून कर्म घडते हे ध्यानात घेऊन कर्तृत्वाच्या अभिमनापासून अलिप्त राहावे.

३) कर्म प्रकृति स्वभावानुरुप होते तदर्थ आपल्या प्रकृतिस्वभावानुरूप प्राप्त झालेले कर्म दक्षतेने करावे.

४) आपल्या स्वाभाविक कर्तव्याला प्रतिकूल होईल असे कर्म करु नये. हट्टाने प्रकृति विरुद्ध जाता येत नाही.

५) सहज कर्म आचरताना मृत्यूही कल्याणप्रद विरुद्ध कर्म करुन लाभाऐवजी हानीच पदरी पडेल.

६) कर्म सर्वस्वी टाकता येत नाही, म्हणून उत्कर्ष इच्छिणाऱ्या मानवाने कर्म त्याग करू नये.

७) यज्ञासाठीच म्हणजे थोरांचा सन्मान, दीनांवर करुणा, बरोबरीच्या लोकाशी संघटना, सर्वासाठी परमार्थ अशी कर्मे मानवाने अवश्य करावीत.

८) लोक संग्रहासाठी – जनतेचे रक्षण व स्वतःसह सर्वांची उन्नती यासाठी मनुष्याने अवश्य कर्म करावे.

९) परमेश्वरार्पण बुद्धीने केलेले कर्म उन्नतीप्रत नेते यासाठी हा उत्तम उपाय आहे. ईश्वराची पूजा करतो या भावनेने आपल्या हातून कर्म घडावे.

१०) वरील पद्धतीने कर्म करणारा माणूस आत्मवान्, आत्मतुष्ट होईल व तो पूर्णावस्थेला पोहोचेल. सांख्य मतात व योग मतात, शरीर तत्व, आत्मतत्व, द्वंद्वातीत स्थिती, इंद्रिय संयम, मनोनिग्रह यांच्या बाबतीत तत्त्वांचे साम्य आहे. मात्र कर्म योगाशी काही गोष्टी विशेष संबंधित आहेत. कर्मतत्त्व, अनासक्ती , ईश्वरार्पण कर्म, लोक संग्रहार्थ कर्म, यज्ञतत्त्व, कर्त्यांचा विचार इत्यादी. सांख्यमन काही विशेष गोष्टी – प्रकृतीच्या गुणापासून कर्म घडते, याचा कर्ता आत्मा नव्हे. सर्व काही प्रकृतीच करते. आत्मतत्वाचा त्या कर्माशी काही संबंध नाही.

आपला मित्र कोण आहे हे श्रीमंताला माहीत नसते.


मनुष्याचे सर्व कर्म जनतेच्या हितासाठी, लोकसंग्रह बुद्धीने आणि त्याचे फल लोकहितार्थ अर्पण करुन टाकावे हाच यज्ञ होय. सर्व जगाची धारणा या यज्ञाने होते. म्हणून यज्ञरूप कर्म मनुष्याने अवश्य करावे. याने चित्तशुद्धी होते. मन स्थिर होते. नंतर ती आत्मानुसंधानाने ब्राह्मी स्थिती प्राप्त करुन घेऊ शकेल. आपल्या कर्माचे फळ सर्व जनतेच्या सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणार्थ अर्पण करण्याची दीक्षा कर्मयोग देतो. अशा पद्धतीने तो सर्वगत आत्म्याचीच उपासना करीत असतो. कर्म प्रथम स्वार्थी, मग परार्थी व शेवटी परमार्थी व्हावे तरच चित्त स्थिर होऊन शेवटी तो कृतकृत्य होतो. थोडक्यात, सांख्य व योग आचरणात भिन्न असले तरी एकाच अंतिम सिद्धिकडे नेणाऱ्या आहेत हे स्पष्ट होईल. एकं सांख्यंच योगंच। यत् सांख्यैः प्राप्यते स्थानं तत् योगैः अपि गम्यते।

**कै. शं. बा. मठ**

●●●

## दुःखद निधन

ठाणे येथील श्री कोपिनेश्वर मंदिर न्यासाचे ज्येष्ठ विश्वस्त आणि 'दिशा' मासिकातून दर महिन्यास सातत्याने लेख लिहिणारे आदरणीय श्री. शंकररावजी मठ यांचे मंगळवार दि. १९ मार्च रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८६ होते.



शंकररावजी हे मूळचे कर्नाटकातील बेळगावजवळील रामदुर्गचे. संस्कृत हा मुख्य विषय घेऊन एम.ए. झाल्यावर ते मुंबईस पोर्ट ट्रस्टमध्ये नोकरीस लागले व ठाण्यात स्थायिक झाले. संस्कृत भाषेकडे तयांचा ओढा असल्यामुळे त्या भाषेच्या संवर्धनासाठी ते प्रथमपासून कार्यरत होते. वेद, उपनिषदे आणि भगवद्‌गीता या अक्षर वाङ्मयाचा त्यांचा गाढा व्यासंग होता. **गेली अनेक वर्षे दिशा मासिकातून लेख लिहून धर्म तत्त्वज्ञानपर विचार आणि संतांची शिकवण लोकांपर्यंत पोहोचविण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले.** त्यांनी लिहिलेली, यमजेत्री सावित्री, नचिकेत, संस्कृत-सुबोध-रामायण, शंकराचार्यांचे चरित्र इत्यादी १४ पुस्तके आजवर प्रसिद्ध झाली आहेत.

गेली ४० वर्षे ते कोपिनिश्वर मंदिराच्या न्यासावर विश्वस्त म्हणून काम करत होते. कोपिनेश्वर मंदिरातील 'ज्ञानकेन्द्र' अथवा धार्मिक/अध्यात्मिक पुस्तकांचे ग्रंथालय उभे करण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. ज्ञानकेन्द्राच्या माध्यमातून त्यांनी अनेक विषयांची धर्म-तत्त्वज्ञानावर भाषणे-प्रवचने प्रसंगानुरूप आयोजित केली. ठाण्यातील विविध संस्थांना धर्म तत्त्वज्ञान संम्मेलने आयोजिक करण्यातही त्यांचा फार मोठा सहभाग होता.

ठाणे येथील श्री अरविंद अभ्यास मंडळाच्या कार्यातही त्यांचा सहभाग होता. प्रतिवर्षी १५ ऑगस्टला ज्ञानकेन्द्राच्या वतीने श्री अरविंदांचा जन्मदिन साजरा केला जातो. गेली अनेक वर्षे ते आर्यधर्म प्रसारक मंडळाचेही अध्यक्ष होते.

शंकररावजींच्या निधनामुळे गेली ५० वर्षे अखंडपणे चालू असलेल्या त्यांच्या ज्ञानदानाच्या यज्ञांत खंड पडल्याचे अनेकांना जाणवेल. आणि म्हणूनच त्यांनी चालू केलेल्या उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असणारे ज्ञानदान चालू ठेवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात वि. प्र. मंडळ सहभागी आहे.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
ठाणे

आरोग्याचा लाभ मिळवण्यासाठी संयमित जगणे गरजेचे असते.

**विद्या प्रसारक मंडळाचे सर्वांत जुने कार्यकर्ते मा. ना. पाटील गेले. त्यांनी संस्थेला दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांनी दिलेला शेवटचा लेख.**



१) पूर्ण नाव : माधव नामदेव पाटील

२) जन्मदिनांक : १९ जुलै १९२६

३) जन्मठिकाण : नासिक

४) शैक्षणिक अर्हता : मॅट्रीक (बॉम्बे युनि.१९४५)

५) शाळेचे/महाविद्यालयाचे नाव : न्यू हायस्कूल, नासिक

६) व्यवसाय : नोकरी

७) नोकरीचे स्वरूप : टंक व लघुलेखन

८) नोकरीचे ठिकाण : १९४५–४७ ठाणे, १९४७–६४ मुंबई, १९६४–८९ ठाणे

९) कंपनीचे नाव : १९४५–५६ न्यायालय (ठाणे, मुंबई), १९५७–८९ ए. सी. सी. लि.

१०) विद्या प्रसारक मंडळात प्रवेश कसा झाला :

संयुक्त महाराष्ट्र लढा १९५६–५७ मध्ये सार्वजनिक चळवळी निमित्ताने लोक-समाजसेवेला सुरुवात झाली व त्याच ओघात वि. प्र. मंडळाच्या शैक्षणिक कार्यात १९५७–५८ मध्ये सक्रिय प्रवेश केला. डॉ. वा. ना. बेडेकरांच्या सहवासात त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या कार्यात सक्रिय सहभाग १९५८ पासून सुरू झाला.

११) कार्यकारिणीत प्रवेश कधी झाला? : १९५७–५८ मध्ये कार्यकारिणी सभासद म्हणून सुरुवात झाली.

१२) कोणत्या पदावर : १९५७–५८ कार्यकारिणी सभासद, १९५८–५९ ते ८८ कार्यवाह १९८९–९१ कार्याध्यक्ष

१३) इतर विशेष माहिती, इतर लोकोपयोगी कामे :

आयुर्विम्याचे प्रसारकार्य १९६४ ते २०००

१४) १/८/२००५ : वयाच्या ८० व्या वर्षी व मंडळाच्या सेवेत सतत ४५ वर्षे कार्यरत होते म्हणून मंडळातर्फे मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

तद्नंतरही मंडळाच्या सभांना व शाळा समिती सभांना हजर राहून मार्गदर्शन करीत. डॉ. वा. ना. बेडेकरांनी स्थापन केलेल्या सत्कर्म प्रतिष्ठान संस्थेचेही ते कार्यवाह म्हणून काम बघत होते.

१५) निधन : २६ मार्च २०१३.

त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात विद्या प्रसारक मंडळ सहभागी आहे.

●●●

# ग्रामीण भागांत पूर्वी घडलेली एक चढाओढ कथा

*ग्रामीण भागांत पूर्वी घडलेल्या एका चढाओढीच्या प्रसंगाची छोटीशी कथा. मा. पाटील साहेबांनी दिशासाठी केलेले हे अखेरचे लेखन.*

फार पूर्वी ग्रामीण भागात घडलेली कथा ग्रामीण भाषेत लिहिण्यापूर्वी शुद्ध मराठी भाषेत कथा थोडक्यात मांडतो.

दोन गावे एकमेकांपासून ५-६ मैलांवर वसलेली असतात. दोन गडगंज श्रीमंत पाटील-एकाचा मुलगा व दुसऱ्याची मुलगी त्यांच्या लग्नाची कथा. एक वेगळा प्रकार लिखाणाचा म्हणून रचना गावरान भाषेत केली आहे.

वरल्या गावच श्रीपत व खाल्ल्यागावच दौलत पाटील. वरलं गाव उगवतीकडे आणि खाल्ल गांव मावळतीकडं.

श्रीपतपाटलाचा पोर आन दौलत पाटलाची पोरगी एका साळत शिकत व्हती. साळमंधी लई वर्ष म्हणून दोघांची लई गटट्री जमली होती.

श्रीपत पाटलाचा पोर हैबती आन दौलत पाटलाची पोरगी शेवंती. जे व्हयाचे तेच झाले. दोघांच्या लग्नाची सुपारी फोडायचा बेत एक दिवस जमला. लगीन ठरलं. तारीख ठरली. लग्नाचा बस्ता बांधायच नक्की झाल. पोराचा बाप श्रीपती बोलला, ''आमची एक अट हाय बरं.'' ''बाबा काय अट हाय?'' दौलतीने इचारल. श्रीपती बोलले, ''तशी काय अट वाकडी तीकडी नाय.'' दौलती म्हणाले,'' वाकडी तिकडी नसंल, पर काय ती सांगा की.'' श्रीपती बोलले,''लगीन सांजचं लागंल. गोरज मुहुर्तावर तवा जेवणाची पंगत तुमची नसंल. आमी पंगत देणार.'' दौलती बोलले, ''असं कसं म्हणता राव. आपल्या पद्धती परमान लगनाची पंगत हमेशा पोरीच्या बापाकडून असते. पण तुमच्या मनांत हाय तर करा तुम्ही पंगत.''श्रीपत पाटलांना त्यांची श्रीमंती दौलतींना दाखवायाची होती. ते श्रीपतींनी कसे दाखविले हा भाग या कथेत पुढे दिला आहे. दौलत पाटलांनी अट मान्य केल्यानंतर लग्नाची सर्व बोलणी संपली. ठरलेल्या दिवशी बस्त्याच काम पण झालं.

लग्नाचा दिस उजाडला. श्रीपत पाटलाचं गावात वजन फार मोठं होतं. गावातील झाडून सर्व मंडळी सर्व वस्त्याचे लोक, ३०-४० बैलगाड्या, ३ ट्रक्टर वगैरे घेऊन सर्व वऱ्हाड खाल्ल्या गावाकडं निघालं. सांज व्हायच्या पूर्वी लग्नाच्या गावी पोहोचलं. श्रीपत पाटलांनी बरोबर स्वयंपाकासाठी खास माणसे सर्व साहित्यासह घेतली होती. जेवणाचा बेत- साजूक तूपातला साखरेचा शिरा. डाळ भात, कढी व भाजी याप्रमाणे होता. त्या काळच्या प्रथेप्रमाणे ग्रामीण भागातील लग्नामध्ये लग्नानंतर जवणाची पंगत नवरीकडून असे आणि गव्हाचा लापशी रवा (जाडा), याची डालडा वनस्पतीमध्ये भाजून व गूळ घालून लापशी हे पक्वान्न असायचे. त्याकाळी साखरेचा शिरा आणि तो बेदाणे, वेलची वगैरे घालून साजुक तुपातला म्हणजे खूप श्रीमंतीचं लक्षण समजलं जाई. त्यासाठीच श्रीपत पाटलांनी लग्नानंतर जेवणावळीची अट घातली होती. लग्नाचे वऱ्हाड दौलत पाटलांच्या गावी पोहचण्यापूर्वी स्वयंपाक करणारी माणसे जाऊन स्वयंपाक करायला लागली होती.

लग्नाचे वऱ्हाड दुपारी ३ वाजेपर्यंत आले. त्यानंतर नवरदेवाची आंघोळ, हळदीचा कार्यक्रम आटोपला. सर्व वऱ्हाडी मंडळींच्या नातेवाईकांच्या आंघोळी आटोपल्या. नवरदेव व नातेवाईक, सर्वांना उतरायची सोय वेशीपासून

जवळच असलेल्या श्री हनुमान मंदिरात केली होती व बाकीचे सर्व वऱ्हाडी, स्वयंपाकाची माणसे यांना हनुमान मंदिराच्या शेजारी एक मोकळी पडवी व मोकळे मैदान होते तेथे उतरण्याची सोय केली होती. मंदिरापासून गावाची वेस जेम तेम अर्धा पाऊण फर्लांग दूर होती.

लग्नाचा मंडप दौलत पाटलांच्या वाड्याच्या प्रशस्त जागेत टाकला होता. लग्नासाठी येणाऱ्या मंडळींना जमिनीवर बैठका ठेवल्या होत्या. लग्न गोरज मुहुर्तावर लागणार होते. नवरदेवाची घोड्यावरून मिरवणूक आली. लग्नासाठी लोक जमले होते. मंगलाष्टके होऊन लग्न एकदाचे लागले. श्रीपत पाटलांचा हैबती आणि दौलत पाटलांची शेवंती या दोघांचे लग्न लागले.

श्रीपत पाटलांच्या अटीप्रमाणे जेवणाच्या पंगतींना सुरुवात करण्यापूर्वी श्रीपत पाटलांनी गावात दोन तीन वाण्याच्या दुकानामधून टेंबे लावण्यासाठी रॉकेल आणण्यासाठी माणसे पाठविली ती सर्व दुकाने फिरून हात हालवीत परत आली. सर्व दुकानांमध्ये रॉकेल संपले होते. ''पाटील, सर्व दुकाने हिंडलो सगळीकडे घासलेट संपले.'' खरे म्हणजे रॉकेल संपले नव्हते. भरपूर रॉकेल होते पण दुकानदारांनी संपल्याचे सांगितले. याचे कारण म्हणजे श्रीपत पाटील. पाटलांनी घातलेल्या अटीचा विचार करुन दौलत पाटलांनी दुकानदारांना बजावले होते रॉकेल संपल्याचे सांगा. अजिबात रॉकेल देवू नका.'' दौलत पाटलांचा गावात भक्कम वजन होते, आणि एक संपन्न व्यक्ती म्हणून त्यांना मान होता.

जेवणाच्या पंगती मोकळ्या जागेत व रस्त्यावर पार पडल्या. १०० च्या संख्येत चार/पाच पंगती बसणार होत्या. आजच्या सारखे रस्त्यावर विजेचे दिवे नव्हते. रॉकेलचे टेंबे लावून पंगती उठणार होत्या. श्रीपत पाटलांनी त्यांच्या माणसांना सांगितले, ''आपले साजुक तुपाचे डबे शिल्लक असतील ते तूप पातळ करुन टेंबे लावा. पण कसेही करुन पंगती उठल्या पाहिजेत.'' साजुक तुपाचे टेंबे लागले आणि जेवणावळी पार पडल्या.

दौलत पाटलांनी रात्रीत बुंदीचे लाडू करुन घेतले. पहाटे दिवस उजाडण्यापूर्वी हनुमान मंदिर गाठले. लग्नाचे वऱ्हाड त्यांच्या गावी जाण्याच्या तयारीत होते. दौलत पाटलांनी हनुमान मंदिराच्या पायरीपासून ते गावाच्या वेशीपर्यंत बुंदीच्या लाडूच्या पायघड्या रस्त्याने घातल्या. श्रीपत पाटील निघण्याच्या तयारीत होते. दौलत पाटील त्यांचा निरोप घेण्यासाठी आले आणि म्हणाले, ''श्रीपत पाटील, वऱ्हाड परत जाण्यासाठी वेशीपर्यंत पायघड्या घातल्या आहेत. वऱ्हाड सुखरूप परत जाऊ द्या.'' बोलत बोलत ते मंदिराबाहेर आले तो काय पायरीपासून वेशीपर्यंत बुंदीच्या लाडूच्या पायघड्या घातलेल्या होत्या. ते पाहून श्रीपत पाटलांनी दौलत पाटलांच्या गळ्यात हात घालून मिठी मारली. डोळ्यात आसू आणून ते दौलत पाटलांना म्हणाले, ''दौलत पाटील, माफ करा. मी तुमची जिरवायचा बेत केला होता पण तुम्ही मलाच जिरविले.''

नंतर संपूर्ण वऱ्हाड लाडूच्या पायघड्यांवरुन गावी परत आले.

**कै. मा. ना. पाटील**

(ज्येष्ठ सभासद,
विद्या प्रसारक मंडळ कार्यकारिणी)

***दिशा संपर्क दूरध्वनी***

**०२२-२५४२ ६२७०**

# जीनान : एक औद्योगिक शहर

*चीन मधील जीनान हे एक महत्त्वाचे शहर आहे. त्याबद्दलची ही माहिती – संपादक*

जीनान या शब्दाची फोड जी+नान अशी होते. यांतील जी हा शब्द नदीचे नाव दर्शवितो तर नान याचा अर्थ दक्षिण असा होतो. जी नदीच्या दक्षिणेला असलेले गाव असे या शहराचे नाव आहे. प्राचीन काळी अस्तित्वात असलेली जी नदी आता अस्तित्वात नाही. पिवळ्या नदीने १९ व्या शतकात प्रवाहाची दिशा बदलल्याने जी नदचे पात्र त्यात सामावून गेले आहे. आता जी नदीच्या ऐवजी शहराच्या उत्तरेला पिवळी नदी आहे. याखेरीज जीनान हे रेल्वचे जंक्शन आहे. तेथे देशातील दोन रेल्वे मार्ग एकत्र येतात. तसेच दोन महामार्गदेखील एकत्र येतात. त्यामुळे शांघाय, बिजिंग यांसारख्या मोठ्या शहरांना येथून औद्यागिक उत्पादनांचा पुरवठा करता येतो. पूर्वीच्या काळी जीनान हे शेतमालाची बाजारपेठ म्हणून ओळखली जायची. आता जीनान हे शहर वेगवेगळ्या उद्योगांसाठी ओळखले जाते. दळणवळणाची सोय, प्रशिक्षित माणसे आणि उपलब्ध साधनसंपत्ती याचा उपयोग करून नवनवीन उद्योगांना येथे पाचारण करण्याचे धोरण चीन सरकारने राबविले. त्यांच्या धोरणांना चांगले यश आले असून आजमितिस ट्रक कारखान्यापासून तर सॉफ्टवेअर उद्योग असे अनेक प्रकारचे उद्योगधंदे आपल्याला या शहरात पाहायला मिळतात. हे यश चीनने कसे मिळविले हे जाणून घेणे उद्‌बोधक ठरेल.



**शहराचे प्रवेशद्वार असे सुशोभित केलेले आहे**

१९९१ मध्ये या शहराजवळ जीनान हायटेक इंडस्ट्रीयल झोनची स्थापना करण्यात आली. शहराच्या उत्तरेला वसलेल्या या झोनचे एकूण क्षेत्रफळ आहे ८३ वर्गकिलोमिटर. एकीकडे या झोनचा विकास चाललेला असतानाच दुसरीकडे या झोनमध्ये येण्यासाठी आंतरराष्ट्रीय उद्योगांना पाचारण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांना यश येऊन एलजी, पॅनासोनिक, व्होल्वो, सॅन्यो अशा कंपन्यांनी आपले उद्योग येथे उभारले. एवढ्यावरच न थांबता चीनी राज्यकर्त्यांनी जीनान एक्सपोर्ट प्रोसेसिंग झोनची निर्मिती केली. निर्यात करण्यायोग्य वस्तूंची निर्मिती करणे हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. २१ व्या शतकाची सुरुवात झाली तशी इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाची वाढ होऊ लागली. ही चाहूल ओळखून जीनानमध्ये साफ्टवेअर झोन निर्माण करण्यात आला. क्विलू (Qilu) नावाच्या परिसरात असलेला साफ्टवेअर पार्कला 'बंगलोरच्या साफ्टवेअर पार्कची बहीण' असे म्हटले जाते.



**प्रदर्शनस्थळाजवळील पृथ्वीचा गोल**

उद्योगधंद्याच्या वाढीबरोबरच शिक्षणाची सुविधा देखील शहरामध्ये विकसित झाली. या शहरात वेगवेगळी

१८ विद्यापीठे असून तथे २००,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. २०० हून अधिक संशोधन संस्था शहरात असून राष्ट्रीय दर्जाच्या १० राष्ट्रीय प्रयोगशाळा आहेत. मुख्य म्हणजे चीनच्या प्रतिष्ठेचा ट्रक बनविण्याचा कारखाना सायनोट्रक याच शहरात आहे. मुळातले शेतीचे बाजारपेठ असलेले शहर अवजड यंत्र निर्मितीचे केंद्रस्थान बनले. त्यानंतर थोड्याच कालावधीत ते साफ्टवेअर शहर बनले. अशा या शहराच्या औद्यागिक विकासाचा आलेख आहे.




**ट्रक निर्मिती कारखान्याची इमारत**

चीनने मागील काही वर्षात शहरांचा चांगला विकास केला आहे. या विकासाची चिन्हे आपल्याला जीनान शहरात दिसतात. शहरात सर्वत्र उत्तम स्थितीतील बहुपदरी रस्ते आहेत. त्याचबरोबर आवश्यक तेथे उड्डाणपूल बांधलेले आहेत. शहरात उत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. त्याचा वापर करून लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अतिशय कमी वेळात आणि कमी खर्चात जाऊ शकतात. आर्थिक स्थिती सुधारल्याने काही जणांनी चार चाकी वाहने विकत घेतलेली आहेत. तरीदेखील दुचाकी वाहने हेच बऱ्याच जणांचे प्रवासाचे साधन आहे. त्यामध्येही खूप विविधता आढळते. अगदी लहान आकाराची स्वयंचलित दुचाकी वाहने आपल्याला रस्त्यावर दिसतात. काही जणांनी तर आपल्या सायकललाच यंत्रे लावून ते स्वयंचलित केले आहे.



**लहान आकाराची स्वयंचलित वाहने**

फुटबॉल हा जीनानमधील लोकांचा आवडता खेळ आहे. शानडाँग फुटबॉल क्लब हा देशातील नावाजलेला क्लब आहे. या क्लबने देशातील अनेक स्पर्धांमध्ये बक्षिसे प्राप्त केलेली आहेत. २००९ मध्ये, म्हणजे ऑलिंपिक्स भरविल्याच्या पुढच्या वर्षी या शहरात ११ वी राष्ट्रीय क्रीडास्पर्धा भरली होती. या स्पर्धेच्या निमित्ताने अनेक मैदानाची निर्मिती केली आहे. गावाच्या थोडे बाहेर पडले की अशा प्रकारची स्टेडिअम आपल्याला पाहायला मिळतात. त्यातील सगळीच्या सगळी भव्य असून सर्व सुविधांनी सुसज्ज अशी आहेत.



**फूटबॉलचे नवीन मैदान**

जीनान हे झऱ्यांचे शहर आहे असे म्हणता येते. शहरात अनेक ठिकाणी झरे आणि त्याभोवती बांधलेल्या बागा आढळतात. याखेरीज या बागांमध्ये अनेक धार्मिक

स्थळे आहेत. जवळच सहस्त्रबुद्धाची टेकडी या नावाचा एक डोंगर आहे. या डोंगरावर बुद्धाच्या अनेक मूर्त्या कोरलेल्या आहेत. याखेरीज इतर अनेक मंदिरे या डोंगरावर आहेत. सामाजिक क्रांती झाली तेव्हा यांतील बऱ्याच मूर्त्यांची आणि मंदिरांची मोडतोड करण्यात आली. परंतु १९७९ नंतर त्याची डागडुजी करण्यात आली आहे. आता येथील मूर्त्या बघताना किंवा मंदिरे बघताना त्याची नासधूस झाली असावी याची कल्पना देखील येत नाही. एवढे बेमालूमपणे दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.



**शहरातील बाऊटू झऱ्याचे दृश्य**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

## नेव्हर रिप्रेस युअर टीअर्स

नेव्हर रिप्रेस युअर टीअर्स या छोट्या लेखात अश्रू येणे का आवश्यक आहे यावर भाष्य आहे. एक्सप्रेशन ऑफ दे झोशना इन मॅन अँड अनिभव्य' (१८७२) चार्ल्स डार्विन लिहितात, ''इंग्रज माणूस कुचित रडतो. अगदी टोकाचे व विलक्षण दुःख झाले तरच त्याला रडू येते; तर बेटाच्या काही देशांत माणसे मोकळेपणाने व पटकन रडतात व औषधशास्त्राच्या संदर्भासह या लेखात दिलेली माहिती वेगळ्या विषयावरील आहे. १९ व्या शतकात मॅन्युअल ऑफ सायकॉलॉजिकल मेडिसीन आवृत्ती ४थी १८७९ पॉल बकवील व डॅनिअल ट्युक म्हणतात, '' पुष्कळ अश्रुपान ही चांगली खूण आहे. मात्र भावनिक संवेदनांशी तिची जोड असू नये. जे मज्जातंतूच्या आजाराचे मूल असू शकते.''

नेव्हर रिप्रेस युअर टीअर्स
जीन मेरी, लंडन विद्यापीठ
वेलकम हिस्ट्री : स्प्रिंग्र २०१, पृ.९
संकेत स्थळ : www.wellcome.ac.un/wellcomehistry

**संकलित**

•••

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल - साधना

*या लेखमालेतील पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

पंडित दीन दयाळ उपाध्याय ह्यांच्या एकात्म मानव दर्शन या या विचारावर चर्चा करण्याकरिता ठाण्याला जे संमेलन झाले. दि. १०-२-२०१३ रोजी त्यावेळेला माझ्या दिशामधीलच ६ लेखांची एक पुस्तिका प्रसारित करण्यात आली. त्यानंतर, मला माझ्या काही मित्रांकडून असे विचारण्यात आले कीं या विचारांवर आधारलेला बदल घडवून आणण्यासाठी काय कार्यक्रम राबवता आला पाहिजे.

प्रश्न बरोबर आहेच, गंभीरही आहे, पण त्याचे उत्तर देणे साधे सोपे काम नाही. त्यावरील माझे उत्तरदेखील अगदी व्यक्तिगत असणार व त्यावर सखोल विचार हा प्रत्यक्ष समाजात कार्य करणाऱ्या प्रचंड कार्यकत्यांकडून व विचारवंतापासून व्हावयाला हवा. एव्हढेच नव्हे तर त्या उत्तरांत सामील असलेल्या विषय, साधना, यावर काम करणाऱ्या अनेक संस्थांना मूलभूत विचार करुन अनेक सुधारणा, दुसरत्या, संशोधन व त्यावर हूकूम बदल करणे आवश्यक ठरेल. माझा हा विचार आहे तो प्रत्यक्ष कार्यक्रमाची रुपरेषा मांडताना व त्यावर विचार करताना लक्षात येऊ लागेल. मला याची अपेक्षा आहे व खात्रीही आहे.

**मूलगामी बदल**

तेव्हा हे मूलगामी बदल कोणते ते मांडण्याचा प्रयत्न करू या.

'कम्पूनिझम व कॅपिटॉलिझम' या मूलभूत दोन तत्त्वज्ञानाचा प्रभाव नजीकच्या काही शतकांत पडला. तसेच भौतिकवादी विज्ञान व भौतिकवादी समाजशास्त्र ह्या दोन्ही सामाजिक तत्त्वप्रणालींमुळे केवळ विचारांतच नव्हे तर राज्ययंत्रणा, सामाजिक आदर्श तत्त्वे व आचार ह्यावर खोलवर परिणाम झालेला आहे. ह्या तत्वज्ञानाच्या प्रभावाने ज्या शिक्षण व संस्कार संस्था कार्यरत होत्या त्यांचा प्रभाव नवीन जन्माला आलेल्या पिढीवर आहे. तसेंच ह्या नवीन पिढीला संस्कारित करणाऱ्या सामाजिक संस्था व खुद्द घरे दारे व कुटुंब, शाळा, कॉलेजे व उद्योगधंदेही या तत्त्वज्ञानांच्या प्रभावाने आज नुसते भारले नाहीत तर त्यावर त्यांचा उदरनिर्वाह व व्यावहारिक आदर्श आधारलेला आहे. त्यामुळे, आपण पुढे ज्या बदलाची, पुनरुज्जीवनाची व भारताच्या आत्मिक व वैश्विक विचारांची आधारलेली योजना व्यवहारात आणू पहात असू त्याला सहजच जोराचा विरोध होणार हे अपेक्षित आहे.

त्यामुळे आपल्या कार्यक्रमाच्या मांडणीत ज्या कलमांचा व मुद्यांचा विचार मान्य केला जाईल, तो अमंलात आणण्याची प्रचंड जबाबदारी या सुधारणावादी कार्यकर्ते व नेते यांवर पडेल ह्याची मला पूर्ण खात्री आहे. पण, ह्या विरोधांची कारणे जाणल्यावर कार्यक्रमाची आखणी करता येईल.

**रूपरेषा**

आपण आता या रुपरेषा कोणत्या त्याकडे वळू या. आपल्या राजकारणाचा, समाजसुधारणाचा मानव व समाज याच्या मर्त्य वैश्विक अस्तित्वाच्या सत्यतेपासून साफ संबंध सुटला आहे. व्यष्टी, समष्टी, सृष्टी व परमेष्टी ह्यांच्या

अस्तित्वात 'शरीरबद्ध आत्मा' असा जो जीवात्मा व ह्या जीवात्म्याचाच संग्रह असा जो समाज ह्याला ह्या वैश्विक योजनेची काहीही पूर्ण माहिती नाही. त्यांचा जीवन व्यवहार व आदर्श सुद्धा ह्या सत्य अस्तिवाशी जोडलेले नाहीत.

हे संपूर्ण विषय ह्या भौतिकवादी समाजाने अंगाबाहेर टाकले आहेत. हे प्रचलित धर्माचे विषय आहेत व ते सुद्धा पुष्कळशा अर्थाने अपूर्ण वैश्विक ज्ञानावर व केवळ मानव निर्मीत श्रद्धांवर आधारलेले आहेत. ह्या तऱ्हेच्या दुहेरी पद्धतीने समाजाची वाटचाल चालू आहे व त्याचाच परिणाम समाज आज गोंधळलेल्या व विनाशाकडे पावले पडणाऱ्या मार्गावर मार्गक्रमण करताना दिसत आहे. ह्याचे कारणच धर्म व विज्ञान आज पूर्णपणे मानवी वैचारिक दर्शनावर आधारलेले आहे. सत्यवैश्विक दर्शनावर नव्हे!

**राज्य व समाज यंत्रणा अज्ञानी**

ह्या सर्वांवर बदल करण्यासाठी जे राज्यकर्ते सत्तेवर आहेत व ज्यांच्यावर भरवसा ठेवून जनता जीवनक्रम व जीवन चालवत आहे, ते एकांगी भौतिकवादी व कलियुगातील सुप्त आसुरी व तामसी वृत्तीकडे झुकणाऱ्या मार्गाने 'राज्ययंत्रणा' राबवत आहेत. थोडी अज्ञानामुळे व थोडी जाणीवपूर्वक ही गोंधळलेली यंत्रणा कार्यरत आहे. त्या प्रभावाखाली मूलभूत बदल घडवून आणणे हे कठीण तर आहेच. पण त्याला क्रांतिकारक बदल व्हावा लागेल.

मानवी देहाच्या वैश्विक सत्यतेपासून आपण तुटलेले आहोत. कदाचित हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे, हे निदान भारतीय संस्कृतीतील धर्म व अध्यात्म तसेंच वेदिक ज्ञान पाहिले असता सहजच जाणवेल. ह्या जाणीवेला दुरुस्त करुन 'भगवदगीतेसारख्या' सत्य ज्ञानावर आधारून मानवी जीवन व मानवी समाज ह्या दोन्ही घटकांना त्यांच्या खऱ्या जीवनाची आदर्शाची पुनओळख करुन द्यावी लागेल. त्यानंतर समाजाचे सर्व घटक व संस्था नियोजित कराव्या लागतील. कारण सध्याच्या समाजाची जीवननौका सुकाणू नसलेल्या बुडत्या जहाजासारखी आहे. जो पर्यंत त्याला किनारा लागेल असे बिलकूल म्हणता येणार नाही. कारण, सुकाणू असून काय कामाचे? होकायंत्र नाही. त्यामुळे, ह्या अफाट दर्यावर तरंगत रहाण्याचा दुबळा प्रयत्न व त्यातच मौज, मजा व करमणुकीच्या पार्ट्या एव्हढाच कार्यक्रम डोळ्यांसमोर दिसतो आहे. पण ही शाश्वत सुखाची जीवनयात्रा न होता. संपूर्ण मानवी व इतर जीवसृष्टीचा नाश करणारी ठरेल ह्यात शंका नाही.

**भौतिकवादी विज्ञान**

जगातील एकजात सगळे देश व त्यांतील सरकारे समाजाला ह्याच तऱ्हेच्या जहाजात बसून जहाजातील तात्पुरत्या जीवनातील मजामौजांचे चित्र रंगवताहेत. विनाशाकडे ओढत आहेत.

भौतिक विज्ञान 'GOD PARTICLE' दैवी अणू ह्या सध्याच्या शोधावर भिस्त टाकावयाला सुचवताहेत. जणू काही ह्या शोधामुळे सगळ्या जीवनसमस्या झटकन सुटून समाज एका शाश्वत सत्याकडे व शाश्वत सुखाकडे व प्रगतीकडे खंबीरपणे विश्वासून जीवन जगणार आहे!

जगातले सर्व धर्म कुठल्या तरी मर्त्य मानवी प्रेषितांच्या दर्शनावर आधारलेले आहेत. त्याला एकच अपवाद आहे तो म्हणजे भारतीय संस्कृतीतीत श्रृती ज्ञानावर व समाधिजन्य ज्ञानावर व वेदिक प्राप्त ज्ञानावर आधारलेला वेदिक आर्यधर्म किंवा त्याचे सध्याचे नाव हिंदू धर्म होय. पण, तो फक्त पूर्णपणे न जाणलेल्या विचार दर्शनावर आधारलेला आहे. सामर्थ्यशाली व्यवहारात नाही. ह्या हिंदू धर्माची व्याख्या सध्याच्या सामाजिक मानवी ज्ञान किंवा राजसत्ता किंवा उच्च न्यायालयाने केलेली व्याख्या – "Way of Living" सारख्या राजकारणासाठी लोकतंत्रातील उद्दिष्टांसाठी बांधलेली दिसली. तर त्यात नवल नाही. कारण, त्यात वैश्विक सत्यावर व नीतितत्वावर आधारलेल्या दर्शनाची झळाळी किंवा रूप नाही. त्यामुळेच प्रत्यक्षात एकांगी

परिस्थिती सारखीच राहत नसते.

भौतिकवादी विचारांशी जखडलेली आहे.

मूलगामी बदल : जे जाणून घेऊन बदल करणे हा पहिला सर्वात मोठा कार्यक्रम असावयाला हवा. जोपर्यंत मानवी जीवन एकात्म भौतिक व अध्यात्मिक समन्वयी पातळीवर येत नाही तोपर्यंत खरा बदल नाही. ह्या पुढील जबाबदारी फार मोठी व जोखमीची आहे. एकतर ह्या सत्याची जाणीव एका क्षणाला किंवा एका शतकांत झाली तर ते पुरे पडणार नाही. तो फक्त वैचारिक सत्य जाणीवेचा स्पर्श असेल.

कारण हे आहे की हा कार्यक्रम अनंत काळपर्यंत चालणाऱ्या नैसर्गिक व सत्यदर्शनी मानवी प्रयत्नावर एकत्रितपणे, समन्वयाने व जन्म व मृत्यू व त्यानंतरचे जीवन ह्या सर्वांची सांगड घालणारा असावा लागेल.

**पृथ्वी ही वैश्विक युनिव्हर्सिटी**

हे कधी जाणवेल? ह्या पृथ्वीवरील जीवन हे एका वैश्विक युनिव्हर्सिटीसारखे आहे. त्यात विद्यार्थी जन्म घेऊन येतात ते ईश्वर आज्ञेने. त्यानंतर त्यांना मिळालेल्या देह व इंद्रिय यांच्या सामर्थ्यावर प्रकृतीच्या मदतीने एक जीवन शिक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो. जो जास्त सत्य, डोळस व ईश्वरी वा नैसर्गिक योजना म्हणा हवे तर, त्यामार्गाने आखून देण्याची कामगिरी सामाजिक व राजकीय नेतृत्वावर असावयला हवी आहे. आज ह्या जबाबदारीचा पूर्ण अभावच आहे.

त्यानंतर जेव्हा व्यक्ती, व्यक्ती व समाज यांना फक्त न टाळता येणाऱ्या मुत्यूपर्यंत समाज नेतृत्व हात देते, त्यांना पुढच्या प्रवासाची जाणीव व संस्कार करून पुढच्या वैश्विक गूढ व अज्ञात वाटणाऱ्या मार्गक्रमावर पाठवणी करावयाची आहे कारण अपेक्षित संस्कार बदल हा जन्म, पुनर्जन्म ह्या यंत्रणेवर आधारलेला आहे.

**पूर्ण चित्र शोधणे व जाणणे आवश्यक**

ह्या चित्रामध्ये अनेक सखोल विचार अंतर्भूत आहेत, पण ते पूर्ण शिक्षणक्रम जाणल्यावर विस्ताराने आखता येतील व संभाळता येतील. त्याचे वर्णन या छोट्या लेखात अशक्य आहे. म्हणूनच फक्त सुतोवाच केले आहे. तरी देखील आजच्या हिंदू धर्माच्या विस्कळीत का असेना, पण त्या व्यवहारात आजही ह्या खुणा दिसतात. ही अगदी ढोबळ अशी चित्ररचना आहे. पण, त्याचबरोबर ह्या यंत्रणेला संभाळणारी जी Infrastructure अंतर्रचना असणारी समाजसंस्था, शिक्षण, व एकंदरच जीवनाला पूरक असणारी यंत्रणा आहे त्यांत बदल करून त्यांतील Sylabus शिक्षण कार्यक्रम वैश्विक सत्यावर आधारलेला करावा लागेल. तर आणि केवळ तरच हा अनंतापर्यंत चालणारा सत्य संस्काराचा 'विश्वविद्यालयीन' कार्यक्रम एकसूत्री, एक ध्येयांपर्यंत जाणारा व मर्त्य मानव, मर्त्य समाज ह्या चित्रात बदल करुन वैश्विक देहबद्ध जीवात्मा व समाज ह्यांना पाठीवर घेऊन जाणाऱ्या अश्वासारखा प्रवास करील. ह्याचे गूढ वर्णन बृहदअरण्यकोपनिषदात सांपडेल व त्यावर महायोगी अरविंद यांनी केलेले भाष्य वाचल्यावर जास्त प्रकाश पडेल. हे वैश्विक चित्र जाणल्यावर तेव्हाच आपल्या मनात ह्या ईश्वरनिर्मीत वैश्विक यंत्रणेचा साक्षात्कार घडू शकेल.

सध्याच्या भारतातीलच काय पण पृथ्वीवरील सर्व देशातील समाजाची थोड्याफार फरकाने हीच अवस्था आहे. ही विनाशाकडे नेणारी वाटचाल आहे. ब्रह्मपुत्रा किंवा नर्मदा सारख्या नद्यांनी ज्यापद्धतीने आपल्या प्रवाहात संपूर्ण दिशेचा बदल करून दर्शविला तसा सर्व मानवजातीला हा क्रांतिकारी जीवननिष्ठा, व संस्कार व जीवनमूल्यांचा दिशा बदल घडवून आणावा लागेल.

मला हे मान्य आहे की हे अवाढव्य वैश्विक कॅलेंडरमधील दीर्घ काळ चालणारे काम आहे. मानवी

---

आत्म्याला कोणती ओळख नसते.

प्रयत्नांच्या केवळ एकांगी प्रयत्नावर अशक्यप्राय आहे. पण, एकदा का केवळ टिटवीच्या सागर शिकण्याच्या प्रयत्नांएव्हढा, जरी प्रयत्न मानवी समाजाने दाखविला, तर त्याला ईश्वरी मदतीची व निसर्गाच्या मदतीची रसद नक्की मिळेल.

आजच्या विनाशाकडे धावणाऱ्या समाजाची घसरण सुद्धा केवळ काही वर्षात किंवा शतकांत झाली असे म्हणता येणार नाही त्यामुळे हा बदल जरी हिमालयाएव्हढा जबरदस्त वाटला, तरी ह्या बदल करण्याच्या जबाबदारीपासून मानवी समाजाला पर्याय नाही. ही एक नक्की गोष्ट होय.!

हा लेख केवळ या वैश्विक जबाबदारीची जाणीव देण्यापुरता पूर्वरंगी आहे. त्याचा विस्तार पुढच्या लेखामधून चालू ठेवूया.

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## कैं. मठांचे वाचनीय पुस्तक 'उपासना'

९ प्रकरणांतून श्री. मठांनी उपासनेच्या सर्व अंगांवर लिहिलेले आहे. त्यांचे असे हे छोटे पुस्तक २००४ साली मालतीबाई नवाथे ट्रस्टने प्रकाशित केले.

## *काटकसर दिन*

*३० ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक काटकसद दिन' म्हणून साजरा करतात. पण आता परिस्थिती बदलली. घरात आई-बाबा दोघेही कमावते झाल्याने नव्या पिढीने 'काटकसर' हा शब्द त्यांच्या शब्दकोशातून काढून टाकलाय, असे वाटण्यासदृश परिस्थिती आहे. मुलांनी मागणी करण्याअगोदरच पालक निरनिराळ्या वस्तू घरात आणतात. मुलंही ४ दिवस नवी वस्तू वापरतात नि पुन्हा नव्या वस्तूंचा शोध सुरू होतो. यातून मुलांच्या मनात सदैव असमाधान राहते. परिणामी त्यांची जडणघडण योग्य तऱ्हेने होत नाही.*

*तुमची आर्थिक परिस्थिती कितीही चांगली असली तरी मुलांवर काटकसरीचे संस्कार होणे आवश्यक आहे. कारण लक्ष्मी चंचल असते. आज संपन्न घरात वाढलेल्या मुलावर उद्या खडतर जीवन जगण्याची पाळी आली तर तो बदललेल्या परिस्थितीला कणखरपणे तोंड देऊ शकेल का? तेव्हा आपल्या मुलावर आपले प्रेम असेल तर ते फक्त वस्तू आणून देण्यातून व्यक्त करू नका, तर त्याऐवजी मुलांना सृजनातला आनंद शिकवा. याचे उदाहरण म्हणून 'शामची आई' पुस्तकातला एक प्रसंग आठवतो. शामने स्वत: रामरक्षा लिहून त्याचे पुस्तक तयार केले तेव्हा त्याला झालेला आनंद हा पुस्तक विकत घेऊन रामरक्षा म्हटली असती तर तेवढा झाला नसता. 'काटकसर' हा समृद्धीचा मूलमंत्र आहे.*

**– संग्रहातून**

# जागतिक महिला दिनानिमित्त ...

*बलात्कार अत्याचाऱ्याच्या बातम्यांच्या भाऊ गर्दीत 'स्त्री' ही वेदकाळा पासूनच सबल कशी आहे हे अधोरेखित करणारा हा लेख. गेल्या महिन्यातच आंतरराष्ट्रीय महिला दिन झाला. त्या पार्श्वभूमीवर या लेखातील संदर्भ अतिशय महत्त्वाचे आहेत, विचार करायला लावणारे आहेत. स्त्रीच्या या जागृत देवी स्वरूपात सबलतेला लेखिकेने केलेला सलाम खरोखरच सार्थ आहे. – संपादक*

विश्व महिला दिनस्य सर्वेभ्य: अभिनन्दनमहम् करोमि।
विश्व दण्डो भवेत्तस्य नापराधो भवेत् स्त्रिय: ।।

अर्थात – समाजिक समस्यांचे निदान; नियम कायदे बनवून होऊ शकत नाहीत तर त्यादृष्टीने समाजाला संयमाने महिलांना समान व सन्मानपूर्वक वागणूक देऊन त्यांच्या विकासाला प्रोत्साहन देणे, सर्वत्र त्यांना महत्त्व देणे, त्यांचे पालन केले तरच समाज प्रभावशाली बनेल.

स्त्रियांचे अपहरण बलात्कार इत्यादी मानवतेला काळिमा फासणाऱ्या कितीतरी पूर्वीपासून चालत येणाऱ्या समस्या पुरुषांच्या पाशवीक प्रवृत्तीला अंकुश लावण्यासाठी काहीतरी मोठे पाऊल उचलले पाहिजे, अशा अपराध्याला शिरच्छेदाचीच शिक्षा व्हावी, असे बंडपूर्ण उद्गार कोण्या २१ व्या शतकातील स्त्री चे नसून, वेदकालीन स्त्री 'जुहू' हिचे आहेत.

जुहू चे अपहरण राजा सोमाने केले. जुहू चा पती म्हणजे बृहस्पती, सोमाने अपहरण केल्यावर तिला सोडविण्याचे कुठलेही प्रयत्न बृहस्पतीनी केले नाहीत उलट तिचा त्याग केला. हे बघून इन्द्रादी देवतांनी त्याला समजाविले व स्त्रियांचे महत्त्व या श्लोकातून सांगितले.

''न दूताय प्रहये तस्य एषा, तथा राष्ट्रं गुपितं क्षत्रियस्य भीमा जाया ब्राह्मणस्योपनीता दुर्धां दधाति परमे व्योमन्।''

स्त्री अबला, दुर्बल नाही ती भीमा आहे, दुर्गा आहे, तिच्या क्रोधामुळे प्रलय होवू शकतो, तिचे उग्र रूप पुरुषांच्या पापी क्रोधामुळे प्रलय होऊ शकतो, तिचे उग्र रूप पुरुषाच्या पापी प्रवृत्तीसोबत त्याचाही नाश करु शकते. स्त्री शक्ती जागृत झाली तर अपहरण बलात्कारासारख्या अत्याचारांचा नामशेष होईल. या भाषेत इन्द्राने बृहस्पतीची कान उघाडणी केल्यावर बृहस्पतीने तिला राजासोमाच्या पाशातून सोडविले व आदरपूर्वक पत्नी म्हणून तिचा स्वीकार केला.

वेदकाळातील 'इन्द्राणी' या स्त्रीबद्दलही सांगायला मला आवडेल, इन्द्राणी म्हणजे इन्द्रपत्नी जिने त्या काळात स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडली. तिचे विचार म्हणजे – स्त्री स्वभावत:च सहनशील आहे, परंतु याचा अर्थ असा नव्हे की, ती दुर्बल आहे.

'गृभ्णामि सौभाग्यत्वाय ते हस्तम्' तुझा हात माझ्या हाती घेतल्याने मी सौभाग्यवान झालो आहे' असा एक मंत्र विवाहाच्यावेळी वराला म्हणायला सांगतात. याच विचारावर इन्द्राणीने वेदकाळात स्पष्टीकरण दिले की विवाहानंतर पुरुष सौभाग्यवान होतो म्हणून पत्नीच्या निधनानंतर पतीला विधवा म्हणायला हवे, स्त्री चे वैधव्य धर्मप्रणित नाही. आणि म्हणून हे सांगताना आम्ही कोणत्याही स्त्री ने घाबरायला नको आपल्या या विचारांचा प्रसार इन्द्राणीने त्याकाळात न घाबरता केला. इन्द्राणी स्त्रियांना धैर्य – साहस प्राप्त व्हावे म्हणून सांगते की, 'उदसौ सूर्यो अगादूदयं मामेको भग:' नारीच्या भाग्याचा अरुणोदय होतो आहे, चला, उठा लढा!

कन्येचं महत्त्व सांगताना इन्द्राणीने ऋग्वेदात उल्लेख केला आहे की, 'मम पुत्रा शत्रुहणोऽथ मे दुहिता विराट' – कन्या कुळाचे दूषण नाही तर भूषण आहे.

सम्राज्ञी श्वसुरे भव भवसम्राज्ञी श्वश्वां भव।
नन्दादरि सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधिदेवृषी ।।

सर्वांवर शासन करा. दबावाला घाबरू नका. नीडर बना. हेच इन्द्राणी या श्लोकातून सांगते आहे.

शरीर म्हटले की रोग – आजार आलेच पण स्त्री ला जर असे संसर्गजन्य रोग झाल्यावर तिची समाज कशी अवहेलना करतो हे सर्वांना माहितीचे आहे. ऋग्वेदकालीन ऋषी अत्री यांची कन्या 'अपाला' हिला विवाहानंतर कुष्ठरोग झाला. पतीने तिचा त्याग केला. सम्राज तिरस्कार करू लागला. पित्याने जवळ केले म्हणून समाजाने त्यांना पण वाळीत टाकले या सर्व परिस्थितीला सडेतोड उत्तर दिलेय अपालाने रोगी स्त्री ची काळजी घेण्याची जबाबदारी तिच्या पतीचीच आहे हे तिने ठासून समाजाला सांगितले व पतीला तिचा स्वीकार करण्यास भाग पाडले.

विवाहाला उशीर झाल्यास समाजाच्या विविध प्रश्नांमुळे त्रासलेली विवाहयोग्य कन्येच्या समस्येला वाचा फोडण्याचे काम 'सूर्या' या वेदकालीन स्त्री ने केले.

'विश्पला' या स्त्री ने 'कोरडा दुष्काळ' 'पाणी समस्या' इत्यादी प्रश्नांवर त्याकाळी बरेच कार्य केल्याचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. अशिक्षित स्त्रियांना शिक्षण देण्याचे कार्य इतरा या स्त्री ने केले.

वेदविद्या पारंगत गर्गकुलोत्पन्ना कन्या गार्गी अतिशय बुद्धिमती होती, त्याकाळी स्त्रियांचे देखील उपनयन संस्कार होत असे. गार्गीचा देखील हा संस्कार पार पडला होता. या ज्ञवल्क्यासारख्या सर्वज्ञाला 'ब्रह्मवादी' सभेत गार्गीने हरविले होते. तिच्या प्रश्नांमुळे खुद्द याज्ञवल्क्य त्रस्त झाले होते. बृहदारण्योपनिषदात हा संवाद वाचायला मिळतो.

याज्ञवल्क्याला कात्यायनी व मैत्रेयी अशा दोन पत्नी होत्या संसाराचा त्याग करून संन्यास घेण्याची इच्छा आपल्या पत्नीजवळ बोलून दाखविली व त्यांना जे हवे असेल ते देण्याचे वचन दिले. मैत्रेयीने याज्ञवल्क्याला 'ब्रह्मज्ञान' मागितले व कात्यायनीने संसार मागितला व गृहस्थाश्रमाचे महत्त्व सांगितले 'सानन्दं सदनं सुताश्च सुधिय: कान्ता न दुर्भाषिणी.

कात्यायनीच्या काही सूक्तांतून हे स्पष्ट होते की, वेदकालीन समाजात स्त्रिया कामाचारा बाबतीत मुक्त संवाद करत होती.

न वा अरे पत्यु: कामाय पति: प्रियो भवति।
आत्मनस्तु कामाय पति: प्रियो भवति ।।

स्त्रियांना वेदादी सर्वप्रकारची शिक्षा ग्रहण करावीच असा आग्रह धरणारी 'मेधा' अतिशय अग्रणी मानली जाते.

वैदिककाळात सामाजिक जीवन निरोगी व प्रसन्न होते. स्त्रियांमध्ये सूक्तकार ब्रह्मवादिनी सापडतात. ऋग्वेदात २६ सूक्तांच्या प्रणेत्या स्त्रिया आहेत. ऋग्वेदकालीन कुटुंबसंस्थेत प्रतिष्ठा सारखीच मानली जाते असे. त्याकाळी एखाद्या दाम्पत्याला पुत्र नसेल तर, मुलीचा अधिकार पुत्रवत मानला जायचा अशा मुलीला 'पुत्रिका' म्हणत असे.

पत्नी या दृष्टीने स्त्रीची प्रतिष्ठा गृहसंस्थेत मुख्य मानत असत. विशेषत: क्षत्रिय कुळातील स्त्रियांना युद्धात सारथ्य करण्याचा अधिकार असे. ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडळात सांगितले आहे की पत्नी हेच गृह आहे 'इयं जाया वै गृहम्' आपस्तम्ब धर्मसूत्रात स्त्रीला 'पुरंधियोंषा' म्हटले आहे अर्थात गृहसंस्थेचा भार उचलणारी स्त्री म्हणजे 'पुरंध्रि' वधू स्वत: आपला वर पसंत करत असे 'भद्रां वधूर्भवति यत्सुवेशा: स्वयं सा मित्र बृनुते जनेचित्' 'गोधर्म' या नियमाखाली लहान मुलींवर लैगिंक अत्याचार करणे घोर पाप मानीत असत.

---

मरण्यापूर्वी वैर व वासना यांचा त्याग करावा.

'मातृवान पितृवान आचार्यवान पुरुषो वेद' अर्थात मातेला पिता व गुरुंपेक्षा देखील अधिक वंदनीय मानले गेले आहे.

लोपामुद्रा, वाघ्रिमती, घोषा, उर्वशी, उषादेवी, अदिती, सरस्वती, दासपत्नी, जाबाला, सुकन्या, इन्द्रसेना, राशीयसी इत्यादी कितीतरी ऋग्वेद कालीन स्त्रियांनी समाज सुधारणेस प्रयत्न केले.

ऋग्वेद काळात स्त्रियांना भरपूर मान- सन्मान होता व त्याही काळी स्त्रियांनी आपला अधिकार मिळवला व त्यांना तो मिळाला देखील तेव्हा पुर्नविवाहाला मान्यता होती.

परंतु ब्रह्मसूत्राच्या रचनेच्या काळात मात्र स्त्री – पुरुष, उच्च हीन अशी फारकत निर्माण झाली, स्त्रियांचे वैदिक अधिकार हळूहळू काढण्यात आले. त्यांना मन्त्रोच्चारण करण्याचा अधिकार नाही, वेदमन्त्र त्यांच्या कानावर पडू नयेत म्हणून काळजी घेण्यात येवू लागली. स्त्रियांनी संस्कृत भाषा बोलू नये अशाही जबरदस्ती करण्यात येवू लागली. त्यांच्या शिक्षणावर बंधने आली त्यांच्या इच्छा आकांक्षा दाबण्यात येवू लागल्या. 'चूल आणि मूल' अशी तिची अवस्था झाली. अतिशय प्रगल्भ अशी स्त्री घरातच राहू लागली. नंतर सती जाणे, केशवपन इत्यादी रूढींचा घाला स्त्री समाजावर झाला, त्यामुळे ती कोमेजून जात असताना राजा राममोहन राय, ज्योतीबा फुले, आगरकर, महादेवराव रानडे, धोंडो केशव कर्वे यांसारख्या समाज सुधारकांनी ही परिस्थिती बदलण्याचा विडा उचलला.

१९ व्या शतकात स्त्रियांच्या विकासाच्या सुधारणेच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात झाली. याच शतकात स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या सामाजिक रू ढी कमी करून स्त्रियांना कायदेशीर अधिकारांचा आधार देण्यास सुरुवात झाली.

२० व्या शतकात प्रगतीला आणखी वेग आला शिक्षणाला असणारा विरोध जवळपास संपला. स्त्रिया सार्वजनिक कार्यात सहभागी होऊ लागल्या शिक्षण, साहित्य, कला, समाजकारण आणि राजकारण यांत पुन्हा एकदा स्त्री ने स्वत:ची क्षमता सिद्ध केली.

राजकुमारी अमृता कौर यांचा पहिल्या मंत्रिमंडळात आरोग्यमंत्री म्हणून समावेश आणि विजयालक्ष्मी पंडित यांची रशियामध्ये भारताच्या वकील म्हणून झालेली नियुक्ती, पोलादी पुरुष म्हणून सर्वश्रुत असलेल्या भारताच्या पहिल्या स्त्री पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

स्त्रियांची राहणी बदलली, वेषभूषा व केशभूषाही बदलली विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात भारतीय स्त्री ची प्रतिमा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरही विविध संदर्भात बदललेली दिसते. कलावंत, संशोधक, लेखक, विचारवंत, लष्करी अधिकारी, राजकीय नेतृत्व करणारी, विमान – ट्रेन, बस रिक्षा चालविणारी, ट्रेकींग – स्केटींग असे कुठलेच क्षेत्र नाही, जिथे ती पोचली नाही. सौंदर्यवती म्हणूनसुद्धा भारतीय स्त्री जगाच्या पाठीवर उभी राहिलेली दिसते.

आज २१ व्या शतकातही पुन्हा एकदा संक्रमणाची चाहूल लागत आहे संस्कृती नवे वळण घेत आहे. मॉल मल्टिप्लेक्स संस्कृती येते आहे. सॉफ्टवेअर बरोबर कॉर्पोरेट विश्वात स्त्रिया उतरत आहे. वेदमन्त्रही जिने ऐकू नये अशी स्त्री आता खुद्द उत्कृष्ट पौराहित्य करते आहे, कॉलसेंटर्स मधूनही स्त्रिया काम करताना दिसत आहेत. कामाच्या वेळा बदलत आहेत. घर-कुटुंब मुले, नातेसंबंध, घरगुती जबाबदाऱ्या यांमध्ये ताण निर्माण होतो आहे. काळाच्या गरजेनुसार पारंपरिक एकत्र कुटुंब पद्धती बदलून विभक्त कुटुंब पद्धती आली असताना आता पुन्हा काळाच्या गरजेतून एकत्र कुटुंबाकडे कल वाढताना दिसत आहे. आपल्या

संस्कृतीचे नवे वळण सांभाळत नवीन बदल स्वीकारण्याची तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यासाठी तिला पुन्हा एकत्र कुटुंब पद्धती महत्त्वाची वाटते आहे, अशा या कर्तृत्ववती स्त्री ला माझ्या लाख लाख शुभेच्छा तिच्या या नारी शक्तीसाठी माझा सलाम!

ऋग्वेदातील १० व्या मंडळात स्त्रियांना समाजाने सन्मानपूर्वक वागणूक कशी द्यावी ह्या अर्थाच्या श्लोकाने सांगता करते.

'प्रियो स्त्रियस्य वृषभस्य रेतिनो गृहं गमेनाश्विना तदुशमसि ।

ता मन्दसाना मनुषो दुरोण आ धत्तं रयिं सहवीरं वचस्यवे ।।

**सौ. स्वाती महेश भालेराव**
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे
(संस्कृत - विभाग)

●●●

## गुरुवर्य स. वि. कुलकर्णी शताब्दी वर्ष

१९१३-१४ हे गेल्या पिढीतील संस्कारक्षम शिक्षक स. वि. कुलकर्णी यांचे शताब्दी वर्ष आहे. सरांच्या पिढीने 'माणसे' घडवली. जीवनाची दृष्टी दिली. सरांबद्दलच्या श्री. नरेंद्र नाडकर्णी यांनी व्यक्त केलेल्या भावना पुढील अंकात. एस्. व्हीं. वर आणखीही कोणाला लिहायचे असल्यास लिहावे. (पुनरुक्ती टाळून)

**- संपादक**

## जीवन गौरव

अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ इव्हन सदरलँड (७४) व जपानचे जीवशास्त्रज्ञ योशिनोरी होसुमी (६७) या दोघांना इना मोरी फाउंडेशनद्वारा देण्यात येणारे क्योटो पुरस्कार जाहीर झाले आहेत. वैज्ञानिक प्रगती व अध्यात्मिकता यासाठी हा जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.

सदरलँड हे पोर्टलँड स्टेट्स येथील ऑरेगॉन विद्यापीठात असून कम्प्युटर ग्राफिक्स चे जनक मानले जातात. होसुमी हे टोकियो इन्स्टिस्ट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील संशोधक असून त्यांनी 'ऑटोफॅगी' या पेशीशास्त्राच्या संदर्भात संशोधन केले आहे. 'ऑटोफॅगी' चा प्रगत अभ्यास हा भविष्यात कॅन्सरच्या उपचारांमध्ये वापरला जाऊ शकतो, असे या वृत्तात नमूद केले आहे. या दोघांना प्रत्येकी पदक, पदविका व ६३०००० पौंड पुरस्कार क्योटो येथे समारंभपूर्वक देण्यात आला.

<u>सायन्स</u> : २३ नोव्हेंबर २०१२
खंड ३३८, पृ. १०१५

**संकलित**

●●●

# रामचरित मानस

*जागेच्या अभावी अनेक लेख मागे राहतात. असाच मागे राहिलेल्या रामचरित मानसावरील हा पुढील लेख. दोन लेखांत पडलेल्या अंतराबद्दल दिलगीर आहोत. – संपादक*

उमाजींच्या ह्या चरित्रानंतर श्री शंकरजींच्या चरित्राचे वर्णन तुलसीदास करतात. श्री सतीजींच्या देह त्यागामुळे श्री शंकरजींना फार वैराग्य आले. ते सदासर्वकाळ राम नामाचे चिंत करू लागले. सर्वकाळ आनंदी श्री शंकर भगवान आपल्या हृदयात ही रामाचे ध्यान करीत पृथ्वीवर भ्रमण करू लागले. कधी मुनींना ज्ञानाचा उपदेश तर कधी रामाच्या गुणांचे गुणगान सांगत. जरी श्री शंकर भगवान कामना विरहित असले तरी आपली भक्ती करणाऱ्या श्री सतींजींच्या विरहाने दुःखी होते. असा बराच काळ गेला. श्रीरामाच्या नामांत खूप प्रेम निर्माण झालं. श्री शंकरजींच हे अविचल नेम आणि प्रेम बघून त्यांचे आराध्य दैवत प्रभू राम प्रकट झाले. श्री शंकराजींच्या प्रेमाची प्रशंसा केली. तुमच्या शिवाय असे व्रत कुणीच करू शकत नाही ह्यांची त्यांना खात्री दिली. श्री शिवजीनी खूप समजावून सांगितलं. पार्वतीच्या जन्माचे रहस्य त्यांना सांगितलं. गिरीजांची प्रशंसनीय अदभुत करणी विस्तारासह त्यांना विषद केली. आणि त्यांना म्हणाले,

**अब बिनती मम सुनहु सिव**
**जो मो पर निज नेहु**
**जाई बिबाहहु सैलजी**
**यह मोहि मागे देहु**

तुमचे जर माझ्यावर प्रेम असेल तर मी मागेन ते मला द्या. तुम्ही आता माझ्या विनंतीला मान देऊन गिरीजाशी (उमा) विवाह करा. श्री शंकर भगवान म्हणाले की हे जरी अनुचित असल तरी आपले वचन मला येणार नाही. तुमची आज्ञा मान्य करणे हाच माझा धर्म आहे.

श्री शंकरजींचे हे वचन ऐकून प्रभूरामचंद्राना फार आनंद झाला व ते म्हणाले की तुमचा पण आम्ही मान राखला तेव्हा आता तुम्ही आम्ही सांगितलेल्या गोष्टी लक्षात ठेवा. अर्थात पार्वतीचा स्वीकार करा असं सांगून प्रभु अंतर्धान पावले. ती सावळी मूर्ती हृदयात ठेऊन श्री शंकर संतोष पावले. यानंतर प्रभू रामचंद्र शिवजींना म्हणाले, यावेळी सप्त ऋषी श्री शंकरजींजवळ आले. त्यांना शंकरजींनी पार्वतीजींची प्रेम परीक्षा घेऊन त्यांना हिमालयाच्या घरी पोहचवून देण्यास सांगितले.

सप्तऋषींनी जाऊन पार्वतीमातेला बघितलं, त्यांना वाटलं जणू तपस्याच पार्वतीमातेचे रुप घेऊन बसली आहे. त्यांनी पार्वतीला विचारले, हे हिमालय पुत्री तू कोणत्या कारणासाठी एवढी घोर तपस्या करीत आहेस, कोणाची आराधना करीत आहेस. आम्हाला खरं सांगा.

पार्वतीमाता हसून सांगते, हे ऋषींनो तुम्ही आमची मूर्खता ऐकून हसाल. मनाला खूप समजावून सांगितल पण ते आपला हट्ट सोडत नाही. नारद मुनींनी जे सांगितल ते खरं वाटून मी पंख नसूनसुद्धा उडण्याचा प्रयत्न करीत आहे. हे मुनिंनो आमचा अविवेक अथवा मूर्खपणा बघा की मला श्री शंकराशी संसार करायचा आहे अथवा मला त्यांचीच अर्धांगिनी व्हायच आहे. हे ऐकूण ऋषी म्हणतात तुझा देहच पार्वताच्या घरी झाला आहे. म्हणजे बुद्धी पर्वतासारखीच मंद अथवा जड आहे आणि दुसरं म्हणजे नारदमुनींचा उपदेश ऐकून तसे वागून कुणाचे घर स्थिर झाले. अथवा कुणाचे भले झाले आहे.

दक्षाच्या मुलीला म्हणजे सतीला त्यांनी उपदेश

दिला. तिने परत येऊन  घर बघितलंच नाही. म्हणजे ती घरी परत आलीच नाही. (सतीने स्वतःच अग्निप्रवेश केला हे आपण अगोदरच बघितले आहे.) चित्रकेतु आणि कनकसिपूंचे तेच हाल त्यांनी केले. नारदजींची शिकवण ऐकून जे वागतात ते स्वतःच्या घराचा त्याग करुन त्यांच्या सारखेच भिकारी होतात. त्याचा देह जरी सज्जनासारखा दिसला, तरी मन कपटी आहे. ते सर्वांनाच आपल्या सारखेच करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तुम्ही अगदी उदास निर्गुण, निर्लज्ज, नंगा आणि अविवेकी अशा माणसांशी लग्न करण्यास तयार झालात. अशा पतीपासून तुम्हांस काय सुख मिळणार. तू त्या नारदाच्या लबाड्याच्या बहकण्यास फसलीस. पूर्वी पंच्याच्या सांगण्याने त्यांनी सतीशी विवाह केला. परंतु पुढे तिचा त्याग करुन तिला ठार करविले. आता त्यांना कसलीच चिंता नाही. भीक मागून खातात आणि सुखाने झोपतात. अशा स्वाभाविक एकट्या राहणाऱ्याच्या घरांत स्त्रिया टिकतील काय ह्याचा विचार करा. ह्या चौपाया फारच सुंदर आहे. त्या आपण बघू.

**दोहा :**

सुनत बचन  बिहसे विषय
गिरीसंभव तव देह
नारद कर उपदेस सुनि
कहहु बस किस गेह
दच्छसुतन्ह उपदेसेन्हि जाई
तिन्ह फिरी भवन  न देखा आई
चित्रकेतु कर धरू उन घाला
कनकसिपु कर पुनि अस हाला
नारद सिख जे सुनहि नर नारी
अवसि होहि तजि भवतु भिकारी
मन कपटी तन सज्जन चिन्हा
आप सरिस सबही चह किन्हा
तेंहि के बचन मानि बिस्वासा
तुम्ह चाचहु पति सहज उदासा
निर्गुन निलज्ज कुवेश कपाली
अकुल अगेह दिगंबर व्याली
कडह कवन सुखु अस बरु पाएँ
भल भूलिहू ढग के बोरुए
पंच कहे सिब सती विबाही
पुनि अवडेरी मराएन्हि ताही

**दोहा :**

अब सुख सोबत सोच नहि
भीख मांगी भव खाही
सहज एकाकिन्ह के भवन
कबहुँ कि नारी खटाहि

अजून सुद्धा आमचे म्हणणे ऐक. तुझ्यासाठी आम्ही एका चांगल्या वराचा (भ्रताराचा) विचार केला आहे. अत्यंत, सुंदर, सुशील ज्याचे गुणगान कोणत्याहि दोषापासून दूर असलेला सकल गुणांची खाण वैकुंठात राहणार अशी श्री पति नारायणाशी आम्ही तुझं लग्न लावून देऊ. तेंव्हा तुझा विचार काय आहे ते आम्हांला तू सांग ह्या ठिकाणी पार्वती मातेने दिलेल्या उत्तराच्या चौपाया फारच सुंदर आहेत. त्या बघू.

सुनत विहसी कह वचन भरवानी (भवानी हसून म्हणाली)
**सत्य कहेहु गिरिभव तनु एहा । हठ न छूट छूटै बरू देहा ।।**

(माझे शरीर पहाडापासूनच झाले आहे हे खरंच आहे. त्यामुळे देह गेला तरी मी माझा हट्ट सोडणार नाही)

**जो तुम्ह मिलतेहु प्रथम मुनीसा । सूनेतिउँ सिख तुम्हारी धरि सीसा ।।**

**अब मैं जन्मु संभु हित हारा । को गुन दूषन करै बिचारा ।।**

तुम्ही जर मला अगोदर भेटला असता तर तुमची

शिकवण मी शिरोधार्य केली असतो. अर्थात ती विचार न करता ऐकली असती. पण आता मी माझा जन्म श्री शंभूना अर्थात महादेवासाठी अर्पण केला आहे. त्यामुळे आता गुण दोषांचा काय विचार करायचा.

जाँ तुम्हरे हठ हदयँ बिसेषी । रहि न जाइ बिनु किएँ बरेषी ।।
तौ कोतुकिअन्ह आलसु नाही । बर कन्या अनेक जग माहीं ।।

जर तुमच्या हृदयात फारच हट्ट असेल आणि लग्न जमण्याशिवाय राहावतच नसेल तर जगांत बऱ्याच वर आणि वधू आहेत. त्यांची लग्ने जमवा. कारण कौतुकाने लग्न जमवणाऱ्यांना आळस तर नसतोच

तजऊँ न नारद कर उपदेसू। आपु कहहिं सत बार महेसू।।
कनकउ पुनि पषान तें होई। जारेंहु सहजु न परिहर सोई।।

सोनं हे पाषाणापासूनच होतं पण जाळलं तर ते स्वतःच पिवळेपण (सौगत्य) सोडत नाही.

नारद वचन न मैं परिहरऊँ। बसवु भवनु उपरऊ नहि डवरुँ।।

नारदांच्या वचनांचा मी त्याग करणार नाही भलेही माझं घर उजाडून गेलं तरी मला त्याच भय वाटत नाही.

गुरु के वचन प्रतीति न जेही। सपनेंहुँ सुगम न सुख सिधि तेही।।

गुरुंच्या वचनावर ज्याचा विश्वास नाही त्याला स्वप्नात सुख, समृद्धी सहजपणे मिळू शकत नाही. विष्णु सर्व सदगुणांचे धाम असले तरी ज्याच मन ज्याच्यात रमत त्याला त्याच्याशी घेण देण असतं. अर्थात त्याला दुसऱ्या माणसांत काहीच रस नसतो.

मी करोडो जन्म घेईन पण लग्न करीन तर ते शिवजींशीच अथवा मी कुमारी राहीन. हा हट्ट मी सोडणार नाही. स्वतः शिवजींनी शंभर वेळा सांगितलं तरी नारदजींचा उपदेश सोडणार नाही. चौपाई बघा किती सुंदर आहेत.

'जन्म कोटि लगि रगर हमारी। बरऊँ संभु न त रहऊँ कुआरी।।
तजऊँ न नारद कर उपदेसू। आपु कहहि सत बार महेसू।।

जनज्जननी सप्तऋषींना म्हणाली, मी तुमच्या पाया पडते. आता खूप उशीर झाला आहे. तुम्ही तुमच्या घरी जा. माझी निश्चयात काहीच फरक पडणार नाही. पार्वतीमातेचा इतका दृढ विश्वास बघून सप्तऋषी प्रसन्न झाले आणि पार्वती मातेला वंदन करुन म्हणाले हे देवी आपण माया आणि शिवाजी भगवान आहेत. आपण दोघे समस्त जगताचे माता पिता आहात आणि ते हिमालयाकडे गेले. हिमालयाला पार्वती मातेला स्वतःच्या घरी घेऊन आणण्यास विनंती केली. त्यानंतर हिमालयाने पार्वती मातेला स्वतःच्या घरी आणले.

सप्तऋषी भगवान शिवाजींजवळ जाऊन त्यांना पार्वतीमातेची सर्व हकिकत सविस्तर सांगितली. पार्वती मातेचा आपल्यावरील स्नेह बघून शिवजी आनंदमग्न झाले. आपला कार्यभाग संपवून सप्तऋषी स्वतःच्या निवासात गेले. त्यानंतर श्री शंकर भगवान स्वतःच्या मनाला स्थिर करुन श्री. रघूनाथाजींच्या ध्यानांत मग्न झाले अर्थात त्यांची अखंड समाधी लागली. त्याचवेळी तारक नामक असुर झाला ज्याने स्वतःच्या बलाने सर्व देवांना जिंकून घेतले. देव सुख संपत्तीपासून विरहीत झाले तो असूर अजेय होता. सर्व देव ब्रम्हाजींकडे गेले. ब्रम्हाजींनी त्यांना दुःखी पाहून उपाय सांगितला की ह्या दानवाचा नाश शिवजींचा पुत्रच करू शकतो. पण ते तर समाधी लावून बसले आहेत. दक्षाची मुलगी सती हिने हिमालयाच्या घरी पार्वतीच्या रूपाने जन्म घेतला आहे. शिवाजींसाठी तिने अपार तप केले आहे. शिवजींची समाधी भंग करण्यासाठी मदनाला पाठवा. त्यानंतर पार्वती आणि शिवजींचा विवाह होऊ शकतो. त्यानंतर सर्व देवतांनी कामदेव म्हणजेच मदनाची प्रार्थना करुन शिवजींचा तपोभंग करण्याची विनंती केली. शिवजींचा तपोभंग केल्यास आपलाच नाश होणार ह्याची पूर्ण कल्पना असून मदन ते करण्यास तयार झाला. कारण

पदपि करब मै काजु तुम्हारा। श्रुति कह परम धरम उपकारा।।
परहित लागि तजइ जो देही। संतत संत प्रसंसहि तेही।।

त्यानंतर सर्व चौपाई आणि ह्यांमध्ये कामदेवानी श्री शंकरजींच्या समाधीचा भंग करण्याच्या विविध उपयांचे वर्णन केले आहे. खूप वाचनीय आहे. शेवटी

**सकला कला करि कोटी विधी हरिऊ सेन समेत**
**चली न अचल समाधी सिव कोपेऊ हृदयनिकेत**

सगळ्या कला करून सुद्धा जेव्हा शिवजींची समाधी भंग होत नाही. त्यावेही कामदेव भयंकर क्रोधीत झाला. आम्रवृक्षाच्या फांदीवर बसून आपल्या धनुष्याला पाच बाण चढवून ते शिवजींचा हृदयावर मारले. बाण लागताच शिवजींची समाधी भंग पावली. त्यांना अत्यंत क्रोध आला. सर्वत्र बघितल तर आम्रवृक्षावर पानांच्या आड बसलेला मदन दिसला. त्याचाही फार राग आला स्वतःचा तिसरा डोळा उघडून त्याच्याकडे बघताच कामदेव जागच्या जागी भस्म झाला. सगळ्या जगात हाहाकार माजला. कामसुखाची आठवण येऊन सामान्य माणूस राक्षस, देव इत्यादि फार चिंतीत झाले. साधक योगी निष्कटक झााले. कामदेवाची पत्नी रतीला आपल्या पती गती बघून फार वाईट वाटले. रडत शिवजींना शरण गेलो. त्यांची खूप विनवणी केली. अबला रति रडतांना पाहून आशुतोष (लवकर प्रसन्न) होणाऱ्या शंकरजींनी तिला आर्शिवाद दिला. 'अब ते रति तब नाथ कर होईहि नामु अनंग बिनु वपव्यापिही सबही पुनि सुनु निज मिलन प्रसंग हे रति तुझ्या पतिचं नाव आता अनग होईल तो स्वतःच्या शरीरात नसून सुद्धा सर्वांच्या शरीराला व्यापून टाकेल आणि तुझं आणि त्याचं मिलन होण्याचा प्रसंग ऐक. **(क्रमशः)**

**प्राचार्य सी. श्री. मुजुमदार**
१०४, फ्लॅट सी–२, इमारत क्रं–३,
सी. एन.सी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई – ४०००४२.
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

## शिजो पेंटिंग

लाखेचा सजावटीसाठी वापर करून जपानी लोकांनी आपली भांडी वापरावयास कधी सुरुवात केली याची नेमकी माहिती नसली तरी सुमारे ५५०० हजार वर्षापूर्वी हे तंत्र त्यांना अवगत होते. जपानच्या बहुतेक भागामध्ये लाखेचे वृक्ष आढळतात, परंतु लाखेपासून येणारी ॲलर्जी अतिशय तीव्र असल्याने लाख हे माध्यम वापरणारे कलाकार कमी आहेत. लाखेचा माध्यम म्हणून वापर नंतरच्या काळात सुरू झालेला दिसतो. जपानमधील बहुतेक सर्व भागात हा वृक्ष आढळत असला तरी त्याचा वापर वरील कारणासाठी केला जातो. परंतु वनस्पतीत आढळणाऱ्या हा रस वाळल्यानंतर त्याचे वजन कमी होते, ते लवचीक बनते आणि मुख्य म्हणजे त्याला पाणी लागले तरी काही होत नाही. ५-६ व्या शतकापर्यंत जलरोधक भांडी फारशी आढळत नसली तरी नंतरच्या काळात लाखेची नक्षी काढली तरी चालू शकते हे ध्यानात आले व असे कलाकार तयार झाले. या कलेला शिजो पेंटिंग म्हटले जाते. ओम्बा हरिरसू (१६६३-१७४७) व शिबटा झोशिन (१८०७-१८९१) हे या कलेतील निष्णात कलावंत होते. शिबटा झोशिनवर एशियन आर्टमध्ये आलेल्या एका लेखात या कलेची बरीच माहिती आहे. या संकेत स्थळाचा संदर्भ सदर लेखात देण्यात आला आहे.

**संदर्भ** : एशियन आर्ट डिसेंबर २०१२
पृ. ८ व ९

**– संकलित**

प्रेम ही वस्तू जगात दुर्मीळ आहे.

# आता तरी जाग येईल का?

*आजच्या सामाजिक स्थितीवर भाष्य करणारा लेख*

भारतीय समाज आज एकूणच फार मोठ्या व कठीण संक्रमणावस्थेतून जात आहे. जागतिकीकरणापूर्वीचा व नंतरचा भारतीय समाज यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता समाजाच्या एकूणच सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक व त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे नैतिक व वैचारिक पातळीवर प्रचंड बदल होत गेला आहे. म्हणजेच शैक्षणिकदृष्ट्या समाज अधिक सुशिक्षित होत आहे. सांस्कृतिक संदर्भ वेगाने बदलत आहेत. आर्थिक सुधारणांची बरी-वाईट फळे चाखायला मिळत आहेत. पण सगळ्यात परिणामकारक बदल होत आहे. समाजाच्या वैचारिक व नैतिक पातळीवर. समाजाची वैचारिक बैठकच बदलत चालली आहे. ''नैतिकता'' म्हणजे नक्की काय? नैतिकतेचा समाजाशी काय संबंध आहे? असा प्रश्नच नवीन पिढीला पडला आहे की काय? अशी शंकाच उपस्थित होते. एकूणच समाजातली ज्येष्ठ पिढी, मधली पिढी व आताची युवापिढी व अजूनही वयाने ''अज्ञान'' असलेली पिढी या सर्वच पिढ्या (कायद्याने) संभ्रमित आहेत.

जागतिकीकरणाच्या ओढ्यात झालेला माध्यम विस्फोट त्यातही विशेषतः इलेक्ट्रॉनिक माध्यमे, ऑनलाइन माध्यमे यांची लाट या सामाजिक बदलाला फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांनी तर आज भारतीय समाज मनाचा कब्जाच घेतला आहे की काय, असे चित्र दिसते आहे. दुसरीकडे इंटरनेटचा प्रसार सोशल नेटवर्कींग साइटस्‌चा वाढलेला वापर या सर्वच गोष्टी मोठ्या प्रमाणावर समाजमन प्रभावित करीत आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये माध्यमांच्या सामाजिक जबाबदारीबद्दल प्रचंड चर्चा होते आहे. माध्यमांनी सामाजिक भान बाळगले पाहिजे अशी टीकाटिप्पणी सर्रासपणे माध्यमांवर केली जाते. मात्र हे सामाजिक भान म्हणजे नक्की काय? सामाजिक भानाची व्याप्ती काय असावी? याबद्दल मात्र विस्तृतपणे सखोल विचारमंथन केले जात नाही. आज आपल्याला माध्यमे आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य घटक वाटत आहेत. माध्यमाशिवाय दिनक्रम/जीवन ही कल्पनाच आपल्याला असह्य होते, पण वीस-बावीस वर्षापूर्वीचा काळ हा माध्यमाशिवाय जगणाऱ्या किंबहुना आजच्या समाजापेक्षा अधिक नैतिकतेने जगणाऱ्या समाजाचा होता हे लक्षात घेतले पाहिजे. एखादेच चॅनल. आकाशवाणीचे कार्यक्रम, वृत्तपत्र, मासिके बस्स. आणखी काहीही नव्हते तरीही सामान्यजनांचा वेळ जातच होता. किंबहुना अधिक शांततेत व समाधानात जात होता. पण जागतिकीकरणाच्या प्रवाहात टी.व्ही. वहिन्या, रेडिओवर एफ. एम. स्टेशन्स पुढे संगणकावर इंटरनेट, सोशल नेटवर्कींग साइटस्, मोबाईलस मग त्यात नवनवीन तंत्रज्ञानाची भरच पडत गेली. आज अक्षरक्षः आपण सर्वच या टी. व्ही., रेडिओ, मोबाईल्स, सिनेमा, इंटरनेटच्या वेढ्यात स्वतःला आनंदाने बांधून घेतले आहे. या यांत्रिक समाजानेच आज मानवाच्या संवेदना बोथट केल्या आहेत. आज आपल्यातले 'माणूसपण' हरवत चालले आहे. माणूस व्यवहारी आणि यांत्रिक बनत चालला आहे. भावना नसलेले यंत्र, संवेदना हरवून बसलेले यंत्र! फक्त हाडामासाने भरलेला म्हणून माणूस म्हणावयाचे बस्स इतकचं! पण माणुसकीचा नैतिक धर्म मात्र नाही पाळला तरी चालेल, अशी आजची सुकलेली माणुसकी

आपणांस सर्वत्र दिसते.

आज देशभरात गुन्हेगारीत प्रचंड वाढ झाली आहे. यात प्रामुख्याने आजचा तरुण गुंतलेला आढळून येतोय असे का होते आहे? आजचा तरुण ''इझी मनी'' म्हणून गुन्हेगारी प्रवृत्तीकडे का व कसे वळतोय याचा विचार आपण करत नाही. आज मोठ्या प्रमाणावर लैंगिक गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. यात अक्षरक्षः अल्पवयीन मुलापासून ते ७० वर्षापर्यंतचे वृद्ध हे गुन्हे करताना पकडले जात आहेत. त्यांना कायद्याने शिक्षा होईलच पण समाज यातून काही धडा घेणार की नाही? गुन्हेगारांना कडक शिक्षा व्हावी म्हणून मोर्चे काढणारा, आंदोलन करणारा समाज, असे गुन्हे का होत आहेत? याचा विचार कधी करणार आहे, असे गुन्हे कसे थांबतील यासाठी काय उपाय योजना केल्या पाहिजेत? याबाबत कधी विचारमंथन होईल व समाजात जागरुकता निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत.

समाजाला 'अशुद्‌ध' 'अनैतिक' वर्तनातून मुक्त करावयाचे असेल तर समाजातल्या प्रत्येक घटकाने आपल्यापरीने प्रयत्न करायला हवा. प्रत्येकाने प्रामाणिकपणे नैतिक मूल्याचे मालन केले पाहिजे. आधी स्वतःला बदलले तर समाजात बदल घडविण्यासाठी नैतिक आत्मबळ प्राप्त होईल. आजच्या आपल्या समाजधुरिणांकडे, राजकारण्यांकडे, आपल्या सेलिब्रिटी आयकॉन यांच्याकडे हे नैतिक पाठबळ आहे का? हा प्रश्न खरोखरच आपल्याला पडला पाहिजे. फक्त चर्चा, भाषणे, मोर्चे, आंदोलने यांतून नैतिक परिवर्तन साध्य होणार नाही. तर त्यासाठी आपण सर्वांनीच जागृत झाले पाहिजे. आज जे या गुन्ह्यांना अत्याचारांना बळी पडलेत ते व त्यांचे कुटुंबीय अनैतिक समाजवर्तनाच्या जात्यात भरडले गेले आहेत. हे जसे खरे आहे तसे हेही आपण लक्षात घेतले पाहिजे की राहिलेले सर्वजण हे सुपातच आहेत. कधीही जात्यात जाऊ शकतो याचा नेम नाही. म्हणूनच आपण, कुणीतरी येईल व समाजात परिवर्तन घडवेल याची वाट न पाहता स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. नाहीतरी समर्थ रामदासांनी म्हटलेच आहे की,

''केल्याने होते आहेचि, आधी केलेचि पाहिजे.''

**श्री. महेश मधुकर पाटील**
सहाय्यक प्राध्यापक
(संज्ञापन व पत्रकारिता)
जोशी-बेडेकर महाविद्यालय

●●●

### *जाणीव*

स्वामी विवेकानंदांच्या मते कपिलमुनी हे सांख्यवेदांताचे जनक व जगातील पहिले मानसशास्त्रज्ञ होते. सांख्य हे जगातील सर्वांत जुने तत्त्वज्ञान होय! कपिलमुनींबद्दल स्वामी विवेकानंद म्हणतात, जगातील या महान मनोवैज्ञानिकाने मानवी जाणीवा ही बाह्य व आंतरजगातील जाणण्याचे तत्त्व आहे हे सांगितले. शरीरापासून सुरुवात करून ईश्वरापर्यंत जाण्याच्या प्रवासात आपल्याला समजणारी प्रत्येक गोष्ट ही या जाणिवेशी निबद्‌ध आहे. शिवाय आणखी काही असे आहे, जे काहीही असू शकते, जे याच्याशी संयोग पावते व सर्वसाधारणपणे या संदर्भात आपण सत्याचा विचार करतो.

- प्रबुद्‌ध भारत-स्वामी नित्यस्थानानंद
जाने.२०१३ पृ.५ व ६
मूळ संदर्भ - द कंप्लीट वर्क्स ऑफ स्वामी विवेकानंद, खंड ९ (कोलकाता, अद्वैताश्रम)

**- संकलित**

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)

### बालदिन

दिवाळीच्या सुट्टीत बालदिन आल्याने शाळा सुरू होताच, म्हणजे ३ डिसेंबर २०१२ रोजी वर्गावर्गात बालदिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. शिक्षकांनी मुलांना पंडित जवाहरलाल नेहरू यांची माहिती व अनुरूप गोष्टीही सांगितल्या.

इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा घेण्यात आली. मुलांनी उत्कृष्ट लेखन केले. मुख्याध्यापिकांनी मुलांचे कौतुक केले.

### क्रीडा स्पर्धा

दि. ४/१२/२०१२ ते ८/१२/२०१२ या दरम्यान इ. १ली ते ४ थीच्या क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या. अडथळा शर्यत, पुस्तक डोक्यावर घेऊन चालणे, लंगडी, धावणे, वस्तू गोळा करणे इ. स्पर्धा घेण्यात आल्या.

स्पर्धा झाल्यानंतर विजेत्या विद्यार्थ्यांना लगेच बक्षिसे देण्यात आली. सर्व शिक्षिकांनी विजेत्या मुलांचे टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले.

### स्नेहसंमेलन

शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि. १६/१२/२०१२ रोजी साजरा करण्यात आले.

समारंभाला प्रमुख पाहुणी म्हणून शाळेची माजी विद्यार्थिनी कु. गायत्री कोलते उपस्थित होती. मंडळाचे मान्यवर श्री. करंदीकर, मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाई व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षिसपात्र मुलांना पारितोषिके देण्यात आली.

'महिमा आदिशक्तीचा' या विषयाला अनुरूप सर्व मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सहल

बुधवार दि. १६/१/२०१२ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची सहल 'टिकोजिनी वाडी' ठाणे येथे नेण्यात आली. सर्व मुले शिस्तीचे पालन करत बसमध्ये आपल्या जागेवर बसली. टिकोजिनी वाडी येताच सर्व मुले रांगेत आत गेली.

झाडांच्या सान्निध्यात आसनांची छान व्यवस्था होती. तेथे मुलांना घरून आणलेला नाश्ता करण्यास सांगितले. त्यानंतर गटागटाने, रांगेत मुलांना सर्व खेळांमध्ये बसवण्यात आले. मुलांनी खेळांचा मनमुराद आनंद लुटला. मध्यान्ह होताच मुलांनी पंगतीत जेवणाचा आनंद लुटला.

त्यानंतर थोड्या विश्रांतीनंतर उर्वरित काही खेळांमध्ये मुलांना नेण्यात आले. अखेरीस आईस्क्रिमचा आस्वाद घेत मुले बसमध्ये बसली.

### मकरसंक्रांती

मंगळवार दि. २२/१/२०१३ रोजी शाळेत मकरसंक्रांती हा सण साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना सभागृहात बसवून प्रार्थना घेण्यात आली.

मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाई व ज्येष्ठ शिक्षिका सौ. घोरपडे बाई यांनी टेबलावर मांडलेल्या सुगडांची यथासांग पूजा केली. सुगडात ठेवलेले हरभरे, ऊस, गाजर,

शेंगा, तिळगूळ इ. पदार्थांची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. हिवाळ्याच्या ऋतूत शरीराला या पदार्थांचा होणारा उपयोग, शेतकरी या अन्नदात्याने पिकवलेली ही अन्नसंपदा यानिमित्ताने होणाऱ्या या पूजेचे महत्त्व, शास्त्रीय दृष्टिकोन विद्यार्थ्यांना पटवून दिले. सौ. अंबिकेबाई यांनीही धार्मिक महत्त्व, अनुरूप गोष्ट सांगितली. तिळाचे लाडू विद्यार्थ्यांना वाटून कार्यक्रमाची सांगता झाली.

### वार्षिक अल्पोपहार

दरवर्षीप्रमाणे यंदा बुधवार दि.२३/१/२०१३ रोजी शाळेचा वार्षिक अल्पोपहार देण्यात आला. मुले रंगीत कपडे घालून नटून-थटून आली होती.

सभागृहात पंगतीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करत आपल्या जागेवर बसून वाढलेल्या पदार्थांचा छान आस्वाद घेतला.

माननीय सभासद व इतर मंडळीं, शिक्षक यांनीही मेनूचा आस्वाद घेतला.

### महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा, शुभेच्छा समारंभ

गुरुवार दि. २४/१/२०१३ रोजी इ. ३ रीच्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यक्रम करण्यात आला.

मुख्याध्यापिका सौ. भंडारे बाई यांनी परीक्षेची पूर्वतयारी याचे योग्य मार्गदर्शन मुलांना केले. तसेच विषय शिक्षक सौ. घोरपडे, सौ. कुडव, सौ. ठाणेकर, सौ. राणे, सौ. अंबिके यांनीही मुलांना मार्गदर्शन केले. उत्तम यश मिळवण्यासाठी खूप शुभेच्छा दिल्या.

### अथर्वशीर्ष पाठांतर

राष्ट्रीय सेवा समितीतर्फे आयोजित अथर्वशीर्ष पाठांतर कार्यक्रमासाठी इ. ३ रीच्या मुलांची निवड करण्यात आली. सौ. पटवर्धन, सौ. शेणॉय, सौ. केतकर या समिती सभासदांनी मुलांना अथर्वशीर्षाचे उच्चारण कसे करावे हे दि. २८/१/२०१३ ते १/२/२०१३ या कालावधीत शिकवले.

अथर्वशीर्ष पाठांतराच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. १६/२/२०१३ रोजी 'उमा नीळकंठ व्यायाम' शाळेत केले गेले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक शाळा

### होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१२-२०१३: प्रात्याक्षिक परीक्षेचा निकाल :

- होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत रौप्य पदक मिळालेल्या विद्यार्थ्यींची नावे खालीलप्रमाणे :

इ. ९ वी – तक्ष सत्रा – सिद्धी सांगलीकर

इ. ६ वी – पालव खांडेकर

- मुंबई ग्राहक मंडळ आयोजित आंतरशालेय नाट्य स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'याला जीवन ऐसे नाव' या नाटकाने तृतीय पारितोषिक पटकाविले : अन्मय जाधव, अनय ताम्हाणे, सुमेध सावंत, शरवीन जोशी, आदित्य जोशी, सौरभ मोरे, पियुश चव्हाण.
- पणजी, गोवा येथे आयोजित गोवा स्केटिंग उत्सव २०१३ मध्ये दीप बअुवा ह्याने दोन सुवर्ण पदके जिंकली.
- मावळी मंडळ आयोजित मुलांच्या १२ वर्षा खालील गोळा फेक स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकाविली:

सिद्धेश कामेरकर – प्रथम पारितोषिक

श्रीपाद साळुंके – द्वितीय पारितोषिक

देवेंद्र सोनावले – तृतीय पारितोषिक

- ब्राह्मण सेवा संघ आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कु. तनुजा महाजन हिने २ रा क्रमांक पटकावला.

**रामायण परीक्षा २०१२-२०१३ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी १७
उत्तीर्ण झालेले विद्यार्थी १५

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | ४ |

**विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे -**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|
| १) अमेय कढे | ७६/१०० |
| २) सुचित गुप्ते | ७६/१०० |
| ३) रुतुज बारगोडे | ७५/१०० |
| ४) दिश चक्रवर्ती | ७४/१०० |

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २०१२ :**

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | २४ | २२ |
| ८ वी | ४० | ३३ |
| १० वी | २५ | २३ |

**सर्वांत जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यींची नावे :**

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | वरुण गोडबोले | ८६ |
| ८ वी | कशवी गाला | ८० |
| १० वी | ओम बापट | ८० |
| | रुतुजा वाळंज | ८० |

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**क्रीडास्पर्धा**

अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघ, मुंबई यांच्या वतीने वार्षिक क्रीडा महोत्सव डिसेंबर २०१२ मध्ये झाला. यामध्ये क्रिकेट या स्पर्धेत बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे च्या संघाने श्री. पी. एम. आरेकर यांच्या नेतृत्वाखाली भाग घेतला होता. तसेच श्री. एकनाथ ल. पार्सेकर यांनी कॅरम व बुद्धिबळ या स्पर्धेत भाग घेतला होता.

**Eco Revolution 2012 (कोलंबो, श्रीलंका)**

प्रा. विनोद जमदाडे यांनी Eco-Revolution 2012 या कोलंबो, श्रीलंका येथे दि. १८ व २० ऑगस्ट २०१२ रोजी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत परिषदेच्या विशेष अंकाचे संपादक म्हणून कार्य केले.

तसेच डॉ. आर. पी. आठल्ये (प्राणिशास्त्र), डॉ. अनिता गोस्वामी गिरी (रसायनशास्त्र), प्रा. सौ. मिनल वानखेडे (गणितशास्त्र), प्रा. सौ. संगीता मेश्राम (पदार्थविज्ञान) यांनी या परिषदेमध्ये भाग घेतला.

प्रा. विनोद जमदाडे यांची WCMANO 2012 या दि. ३ व ५ नोव्हेंबर २०१२ रोजी नागपूर येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत Jt. Secretary म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

**रिसर्च पेपर**

डॉ. सौ. मेधा मुळगावकर, विभाग प्रमुख व कु. श्रद्धा राऊत, वनस्पतिशास्त्र विभाग, यांचा Survey of some Medicinally Important Epiphytic Orchids from Yeoor in Thane या विषयावर Phytotaxonamy Journal of Association for plant Taxonomy नोव्हेंबर २०१२ या नियतकालिकामध्ये पेपर प्रकाशित झाला.

### रस्ता सुरक्षा अभियान उपक्रम

राज्य महामार्ग पोलिसांनी रस्ता सुरक्षा अभियाना-अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. त्यांपैकी एक उपक्रम ठाणे महाविद्यालयाच्या संकुलात दि. ९ जानेवारी २०१३ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात राज्य महामार्ग पोलीस आणि बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

या जनजागृतिपर अभियानात माननीय राज्यमंत्री श्री. सतेज पाटील, राज्य महामार्गाचे अप्पर पोलिस महासंचालक विजय कांबळे, पोलिस उपायुक्त रश्मी करंदीकर ठाणे पोलिस आयुक्त के. पी. रघुवंशी, बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. किरण पारिया, प्रा. प्रकाश माळी, प्रा. बिपीन धुमाळे, प्रा. अनिल आठवले आणि उपप्राचार्य प्रा. विनायक बुरकुले उपस्थित होते. झी मराठीवर गाजत असलेली मालिका 'मला सासू हवी' मधील काही आघाडीचे कलाकार यावेळी उपस्थित होते. त्यांनी वाहतुकीचे नियम कसे महत्त्वाचे आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली; तसेच वेगाला आवर घालण्याचीही सूचना केली.

यावेळी माननीय राज्यमंत्री श्री. सतेज पाटील यांनी विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर, संवाद साधला. आपल्या भाषणात ते असे म्हणाले की, रस्ता सुरक्षा अभियान हा कार्यक्रम सरकारी नाही, तो तुमच्या आयुष्याशी निगडित असल्याने राबविला जात आहे. ज्या आई-वडीलांनी आपल्याला वाढविले, त्यांना आपण नापास झाल्यावर दुःख वाटते. पण, त्यांच्यापासून कायमचे दूर गेल्यावर त्यांची अवस्था काय असेल, याची कल्पना करा आणि कुटुंबाचे महत्त्व ओळखून वागायला शिका; तसेच वाहतुकीचे नियम पाळा, असेही त्यांनी सांगितले.

उद्याचे नागरिक होणाऱ्या तरुण पिढीला ठाणे महाविद्यालय संकुलात वाहतूक संदर्भातले मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

### राष्ट्रीय परिषद 'FUTECH 2013'

गेल्या दोन दशकांपासून तंत्रज्ञानाने मोठी गरुडझेप घेतली आणि येत्या काही वर्षांमध्ये आपण विचारही करू शकणार नाही इतक्या झपाट्याने हे तंत्रज्ञान वाढत जाणार आहे.

भविष्यातील तंत्रज्ञान यावर चर्चा करण्यासाठी बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे ही दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद १८ व १९ जानेवारी २०१३ रोजी ९.३० ते ५.३० या वेळेत थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे संपन्न झाली.

### विद्यार्थ्यांचे यश

कु. रीमा सय्यद या विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठाची M.Sc.by Research ही रसायनशास्त्र विषयातील पदवी डॉ. एम. व्ही. रत्नम यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त केली.

### विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन

सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या काही विद्यार्थ्यांना डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेच्या तोंडी परिक्षेची तयारी कशी करावी याबाबत डॉ. पुजा जगासिया, डॉ. मोजेस कोलेट व प्रा. डी. आर. चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

### पारितोषिक वितरण समारंभ

वार्षिक खेळ बक्षीस वितरण समारंभ दि. २१ जानेवारी २०१३ रोजी पतंजली सभागृहात पार पडला. यावेळी डॉ. मृदुल निळे, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

वार्षिक बक्षीस वितरण समारंभ व संयुजा प्रकाशन सोहळा २४ जानेवारी २०१३ रोजी थोरले बाजीराव पेशवे

चित्तात कोठलाही विकार अजिबात न राहणे याचे नाव चित्तशुद्धी.

सभागृह येथे संपन्न झाला. यावेळी सौ. उषा तांबे, अध्यक्षा, अखिल भारतीय साहित्य महामंडळ या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्यांनी आपला अहवाल सादर केला. तसेच राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, जिमखाना, सांस्कृतिक मंडळ यांच्या प्रतिनिधींनी आपल्या कार्यक्रमांचे अहवाल येथे सादर केले.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे पहिले इलेक्ट्रॉनिक नियतकालिक J-BNB याचे प्रकाशन यावेळी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यात आले.

**शिक्षकेतर कर्मचारी कार्यशाळा सहभाग**

रामानिरंजन झुनझुनवाला महाविद्यालयाने २२ जानेवारी २०१३ रोजी Safety in Laboratory, राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित केली होती. त्यामध्ये श्री. राकेश बने आणि श्री. रविंद्र शेलार प्रयोगशाळा परिचर, रसायनशास्त्र विभाग यांनी सहभाग घेतला होता.

**सेवानिवृत्ती**

आमच्या महाविद्यालयातील प्रयोगशाळा परिचर श्री. एच. एस. नाईक, भौतिकशास्त्र विभाग, श्री. एस. एस. निकम प्राणिशास्त्र विभाग हे ३१ जानेवारी २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय ठाणे

१) आपल्या महाविद्यालयातील क्रिकेटची टीम मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेमध्ये ४ जानेवारी २०१३ या तारखेस सहभागी झाले.

२) दि. २७ फेब्रु. २०१३ रोजी विधी महाविद्यालयात 'मराठी दिवस' साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने 'मराठी नैपुण्य चाचणी स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आली. मराठी नैपुण्य चाचणी स्पर्धेमधील विजेते.

१. मोहन निंबालकर (II L.L.B.) – प्रथम क्रमांक
२. संतोष गिरी (II L.L.B.) – द्वितीय क्रमांक
३. वैशाली पाटील (I L.L.B.)– तृतीय क्रमांक

**वक्तृत्व स्पर्धा विजेते**

१. वैशाली पाटील (I L.L.B.) – प्रथम क्रमांक
२. मोहन सूर्यवंशी (I L.L.B.) – द्वितीय क्रमांक
३. गणेश आचार्य (I L.L.B.) – तृतीय क्रमांक

३) दि. १७ व १८ फेब्रु. २०१३ रोजी लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय नाशिक यांच्या वतीने राष्ट्रीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा "Rising Numbers of Criminals in Parliament & legislative Assemblies is disastrous for democracy" या विषयावर होती. या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. कृष्णा कामत आणि कु. रंजनी कृष्णन प्रथम वर्ष एल. एल.बी. या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

४) आपल्या महाविद्यालयातील प्रा. मिथून बनसोडे यांनी न्यू लॉ कॉलेज पुणे येथे आयोजित केलेल्या UGC पुरस्कृत सेमिनारमध्ये Electrol Reforms : Issues & challenges या विषयावर दि. २३ फेब्रु. २०१३ रोजी पेपर सादर केला.

५) न्यू लॉ कॉलेज मुंबई यांनी दि. २५ फेब्रु.२०१३ रोजी आयोजित केलेल्या अनुराग गायन स्पर्धा यामध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. मधुरा देशपांडे यांनी सहभाग नोंदविला.

६) St. Wilfred Law College, Panvel येथे दि. ९ जाने. २०१३ आयोजित अभिरूप न्यायालय स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील कु. विप्लवी सोनालकर (II-L.L.B.) आणि कु. अलिशा बुर्डे (II-L.L.B.) यांनी सहभाग घेतला.

७) दि. ३१ जाने. २०१३ रोजी के. सी. लॉ कॉलेज ने आयोजित केलेल्या Client Counselling स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील श्री. सौगत हजरा (III L.L.B.) व कु. अलिशा बुर्डे (II L.L.B.) यांनी भाग घेतला.

## तंत्रनिकेतन वार्ता

चौदावी 'Emerging Trends in solar technology' ही एकदिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली.

सूर्यापासून उष्णता व प्रकाश या रूपाने येणाऱ्या उर्जेला 'सौर उर्जा' असे म्हटले जाते. सौर उर्जेमुळे पृथ्वीवरील हवामानात बदल घडून येतात. सूर्यापासून पृथ्वीला उर्जा प्राप्त होते. यातील उर्जा काही परावर्तीत होते तर काही वातावरणात शोषली जाते. या उर्जेमुळे वातावरण व जमीन तापते. वातावरण तापल्यामुळे समुद्र तापतो व पाण्याचे बाष्पीभवन होऊन वातावरणाचे एक चक्र सुरू होते. 'सूर्यप्रकाश' हा पृथ्वीवर प्रकाश मिळविण्यासाठीचा एक मुख्य स्त्रोत आहे. अशाच ह्या मुख्य स्त्रोताचा विविध तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वापर करण्यासाठीचा जगामध्ये कल दिसून येत आहे.



**सदर परिषदे दरम्यान स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर. व्यासपीठावर उजवीकडून प्रा. व्ही. एस. भाकरे, प्राचार्य डी. के. नायक, डॉ. एस. एस. भागवत, डॉ. पी. एम. खोडके, श्री. मिलिंद पाटणकर, डॉ. अनुराधा गणेश व परिषदेच्या संघटन सचिव डॉ. सौ. उषा राघवन.**

शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने खनिज तेलाला पर्याय म्हणून 'सौर उर्जा' एक मुख्य स्त्रोत होत आहे. उर्जा तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार घडवून आणण्यासाठी अनेक तंत्रज्ञ, संशोधक, इंजिनिअर्स या आव्हानात्मक विषयावर एकत्र येत आहेत. अशाचसाठी 'सौर उर्जा तंत्रज्ञान' या मुख्य विषयावर चर्चा करण्यासाठी शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, उद्योजक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ लोकांना एकत्र घेऊन चर्चा घडविण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करणे हा परिषद आयोजनामागचा मुख्य उद्देश होता.

सदर १४ वी राष्ट्रीय एकदिवसीय परिषद वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतन तर्फे दि. ५ जानेवारी २०१३ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे १०.०० ते ५.०० या वेळेत आयोजित करण्यात आली होती. डॉ. पी. एम. खोडके (संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई ) यांचे हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. जागतिक उर्जा समस्येवर उपाय म्हणून सौर उर्जा तंत्रज्ञानाचा विचार करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. सन्माननीय मुख्य अतिथी म्हणून डॉ. अनुराधा गणेश (प्राध्यापक, उर्जाशास्त्र IIT, मुंबई) हजर होत्या. सौर उर्जा ही अक्षय उर्जा असून ती मुख्य स्त्रोत असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध तंत्रज्ञानाद्वारे ती वापरात येण्यासाठी पद्धतीची आवश्यकता आहे. श्री. मिलिंद पाटणकर (सन्माननीय अतिथी उप-महापौर, ठाणे महानगरपालिका, ठाणे) यांनी ठाणे शहराचा सन-सिटी असा उल्लेख करीत उर्जा बचतीचे अनेक प्रकल्प व शिवाय ठाणे हे सोलर सिटी होण्यासठी अनेक उपाय-योजना ठाणे महानगरपालिका योजत असल्याने नमूद केले. डॉ. एस. एस. भागवत (प्राध्यापक व विभाग प्रमुख केमिकल इंजिनिअरींग विभाग IIT, मुंबई) यांनी या प्रसंगी बीजभाषण केले. त्यांच्या सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचा उपस्थितांना चांगलाच अनुभव आला. त्यांनी सौर उर्जा बचत, वितरण, संवर्धन, साठवणूक आणि उपयुक्तता इत्यादी विषयीची विस्तृत व महत्त्वपूर्ण माहिती दिली. प्रोफेसर व्ही. एस. भाकरे यांनी अशा राष्ट्रीय व आव्हानात्मक विषयावरील परिषदेच्या आयोजनाचे विद्यार्थी व स्टाफना फायदेशीर असल्याचे सांगितले.

डॉ. व्ही. एन. मणी (शास्त्रज्ञ, भारत सरकार सेंटर फॉर मटेरिअल्स फॉर इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी (C-MET), हैद्राबाद) यांनी सौर उर्जा तंत्रज्ञानात नॅनो टेक्नालॉजीची

भूमिक या विषयी माहिती दिली. डॉ. बी. जी. अनकामवार (असोसिएट प्रोफेसर रसायनशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ) यांनी सौर उर्जेची सुविधा आणि फायदे विषद केले.

डॉ. डी. के. असवाल (प्रमुख, थिन फिल्म डिव्हायसेस डिव्हीजन, बार्क (BARC),मुंबई) यांनी सोलार सेल विषयीचा मुलभूत अभ्यास आणि रासायनिक सुधारणा व क्षमता याविषयीची माहिती सादर केली.

परिषदेच्या दरम्यान हायब्रीड पॉवर जनरेशन प्लान्टमध्ये सौर उर्जा तंत्रज्ञान, नॅनो टेक्नालॉजी आधारित सोलार सेल्स, फोटोव्हाटटॅक सेल्स, सौर उर्जा पॅनल इत्यादी विषयीची चित्रे (Poster) चित्र प्रदर्शनात मांडण्यात आली होती. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील अकरा पोस्टर्स आली होती. पोस्टर प्रदर्शनात मिस. रेणुका देशपांडे यांच्या 'फोटोव्होल्टक सेल' या पोस्टरला प्रथम तर सौ. वृषाली जाधव याच्या 'ॲडव्हान्समेन्ट इन सोलर पॅनल' ला द्वितीय पारितोषिक मिळाले. प्रोफेसर एस. एस. मुजुमदार आणि प्रोफेसर टि. व्ही. मोहिते-पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सकाळच्या सभांत डॉ. एच. व्ही. मंगळवेढेकर (प्रमुख विद्युत अभियांत्रिकी विभाग VJTI मुंबई) यांनी प्रमुख परीक्षक म्हणून काम पाहिले.

दुपारच्या सभांत खालीलविषयांवर शोधनिबंध सादर केले गेले.

| विषय | सादरकर्ते |
|---|---|
| १) श्री. यशवंत राव (संचालक आप्टो इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.) | • Application of solar photo voltaic on a roof top system. |
| २) श्री. अंकित अग्रवाल (थरमॅक्स लि. पुणे) | • Solar thermal products available a solar applications in industris] domastic and commercial purposes. |
| ३) संगिता वझिराणी (प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स विभाग L&T इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) | • The contribution of theory of Inventive problem solving (TRIZ) in solving real life design problems and steps to bring innovation in solar in verter design. |
| ४) श्री. व्ही. एम. जाधव (प्रमुख विभाग तंत्रनिकेतन रोहेगाव) | • Working and application of thermal power plant using solar energy. |
| ५) सौ. एन. व्ही. वडेर (प्रमुख विभाग वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन) व श्री. एम. एम. दिक्षित (इनचार्ज प्रमुख विभाग बी. एल. पाटील तंत्रनिकेतन, खोपोली.) | • Role of solar energy on smart grid stablility and reliability of supply. |
| ६) सौ. ज्योथी साजी (प्राध्यापक, वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे) | • Latest solar technologies. |
| ७) श्री. राहुल खैरनार व श्री. भूषण जोशी (अभियांत्रिकी विद्यार्थी) | • Using Scheffler cooker for solar cooking and other applications. |
| ८) अभिषेक पारीख (बी-टेक विद्यार्थी एसआरएम विद्यापीठ चेन्नई) | • Printed solar cells. |

दीर्घकाळ आळसात जगला तो जगलाच नाही.

शेवटी श्री. अभिषेक कटियार व श्री. लालजीय सुदर्शन या इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टम वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन या विद्यार्थ्यांनी आपले शोध निबंध सादर केले. श्री. अभय भानुशाली आणि जयंत परब (I.E. Dept) यांनी 'Nanotechnology applications in solar energy विषयी मते व्यक्त केली.

दुपारच्या सत्राचे प्रमुख डॉ. बालाप्रसाद जी. अनकमवार (असोसिएट प्रोफेसर, रसायनशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे) हे होते.

परिषदेची सांगता प्रा. सौ. के. एस. अगाशे यांच्या पसायदान गायनाने झाली.

परिषदेसाठी खालील संघटनांची प्रायोजक म्हणून मदत झाली.

१) मिनिस्ट्री ऑफ न्यू अॅन्ड रिन्युएबल एनर्जी

२) महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन

३) अझिम प्रेमजी फॉऊंडेशन ट्रस्ट.

४) सीसीएल, अल्टोइलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.

५) स्वस्तिक पॉवर इलेक्ट्रॉनिक्स (इंडिया) प्रा.लि.

६) बॉनफ्रिंग इंटरनॅशनल जर्नल.

**सदर परिषदेसाठी नाव नोंदणी खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १) | औद्योगिक प्रतिनिधी | २० |
| २) | आमंत्रित प्रतिनिधी | १५ |
| ३) | आमंत्रित वक्ते | ०७ |
| ४) | शैक्षणिक प्रतिनिधी | ३१ |
| ५) | बाहेरील संस्थांतील विद्यार्थी | ०७ |
| ६) | वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनातील विद्यार्थी | १०५ |
| ७) | वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनातील स्टाफ | ६५ |

शिवाय अनेक प्रतिनिधी हे भारतातील आसाम, हैद्राबाद, चेन्नई, पुणे, डेहराडून, अमरावती आणि नाशिक इत्यादी शहरांतून परिषदेत भाग घेण्यासाठी आलेले होते.

परिषदे दरम्यान प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रोसिडिंग्ज ही नवी दिल्ली येथील मेसर्स एक्सलण्ट पब्लिशिंग हाऊसद्वारे आंतरराष्ट्रीय बुक प्रमाणित नंबरसह प्रकाशित झाली आहे. त्यातील शोध निबंध तज्ज्ञांनी तपासले आहेत. शिवाय ते बॉनफ्रिंग इंटननॅशनल जर्नलमध्ये प्रकाशित झालेले आहेत.

सदर परिषद ही सल्लागार समिती व राष्ट्रीय सल्लागार समितीतील तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. परिषद यशस्वी होण्यासाठी वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. व्ही. व्ही. बेडेकर, प्राचार्य डी. के. नायक (वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) व डॉ. उषा राघवन इत्यादींचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ. उषा राघवन यांनी या परिषदेचे संघटन सचिव म्हणून काम पाहिले.

## डॉ. बा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**Centaurus 2013**

**सेण्टौरस २०१३** : १९.१.२०१३ – २०.१.२०१३

ठाणे, मुंबई, नवी मुंबई आणि रायगड परिसरातील व्यवस्थापन अभ्यास संस्थांमध्ये बुद्धी कौशल्याच्या आधारावर एक सेतू तयार करण्याच्या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १९ व २० जानेवारी २०१३ या दिवशी Centaurus 2013 या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन कौशल्य पणाला लागेल असे अनेकविध शैक्षणिक खेळ, स्पर्धा इ. चे जसे Ad Mad, Biz quiz, Devil's Advocae इत्यादी शैक्षणिक स्पर्धा तसेच कॅरम,

बुद्धिबळ, क्रिकेट या खेळांच्या स्पर्धाही या सोहळ्यात घेण्यात आल्या. Centaurus ही आमच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांसाठी ही एक चांगली संधी असते. कारण या पूर्ण सोहळ्याच्या आयोजनाची जबाबदारी ही आमच्या विद्यार्थ्यांची असते. संस्थेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली Management Students Association (MSA) या समिती तर्फे अनेक विद्यार्थी प्रतिनिधी या आयोजनाचा अनुभव घेतात तसेच इतर संस्थांमधून आलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना देखील इतर हुशार सहाध्यायी स्पर्धकांमध्ये आपले कौशल्य अजमावून पाहता येते. यावर्षी एकूण ८० व्यवस्थापन संस्थांना या सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

**वार्षिक वित्त संमेलन २०१३**

१२.१.२०१३

FINANCE SUMMIT - 2013

''वित्त व्यवस्थेतील समकालीन प्रवाह'' ("Contemporary trends in finance.") या विषयावर आधारित या संमेलनाची सुरुवात डॉ. के. सूर्यानारायणन् (संचालक, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांच्या स्वागत पर भाषणाने झाली. डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, (सरसंचालक डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) आणि डॉक्टर पी. एम. केळकर, (अधिष्ठाता, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांनी संमेलनाच्या विषयाबाबत थोडक्यात विवेचन केले.

संमेलनातील पहिले वक्ते डॉ. विष्णू कान्हेरे यांनी आपल्या बीजभाषणात ('behavious finance') विषयावर मते व्यक्त करताना अनेक उदाहरणे देऊन या विषयाचा अभ्यास करताना मानस शास्त्राचा अभ्यासदेखील महत्वाचा असल्याचे सांगितले. मानवी स्वभावाचा भांडवली बाजारावरील प्रभाव याबद्दलही त्यांनी माहिती सांगितली.

संमेलनातील दुसरे वक्ते चार्टर्ड अकाउंटंट श्री. राममोहन भावे यांनी "International Financial Reporting Standards (IFRS) चे महत्त्व आणि अहवालातील पारदर्शकता या विषयावर खूप रंजक पद्धतीने माहिती दिली. त्यांच्या मते आजकाल जवळजवळ सर्वच महत्त्वाच्या उद्योग क्षेत्रात (IFRS) आवश्यक ठरत आहे. त्यामुळे आज उद्योग संस्थांना त्यांचे ताळेबंद आणि अहवाल (IFRS) च्या आधाराने तयार करण्यासाठी (IFRS) चे जाणकार असलेल्या मनुष्यबळाची खूपच गरज आहे आणि म्हणूनच व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांनी रोजगार संधीच्या दृष्टिकोनातून (IFRS) चा अभ्यास करणे खूप उपयोगी ठरणार आहे. असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

त्यानंतर चार्टर्ड अकाउंटंट श्री. मोसेस अलिआस यांनी वित्तीय व्यवस्थापक (CFO) या पदाचे बदलते स्वरूप, जबाबदारी, उद्योग संस्थांमधील वित्त विभागाची बदलती कार्यपद्धती या विषयावर आपली मते व्यक्त केली. तसेच वित्त व्यवस्थापक या पदापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक गुण वैशिष्ट्ये, कौशल्ये या पदाचे महत्त्व इत्यादी माहिती त्यांनी आपल्या व्याख्यानात दिली.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात चार्टर्ड आकाउंटंट आणि सहा प्राध्यापिका पूनम मुळ्ये यांनी "Contemporary trends in cost management and detailed study on application of 80-20 principle in the Indian Industry." या विषयावर व्याख्यान दिले.

त्यानंतर आमचे विद्यार्थी आफताब दादलानी आणि राकेश चव्हाण यांनी 'Does size matter?' या विषयावर एक सादरीकरण केले. यामध्ये १० अमेरिकेतील व १० भारतीय उद्योग संस्थांचा अभ्यास करून Sales and Market Capitalization व Sales and Net Profit त्यांच्या परस्पर संबंधावर भाष्य करण्यात आले.

संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात सहा. प्राध्यापिका सौ. स्मिता जपे यांच्या अध्यक्षतेखाली एका छोट्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये

प्रेमात वासना नसते, मोह वासनेवर असतो.

श्री. सचिन मेहता (Associate Director Investment Banking, Anand Rathi Advisor Ltd.)

श्री. अमित शहा (Research Analyst, Almondz)

श्री. मिलिन्द सुलाखी CA, (Head-Finance nu Future Digital (India) Limited) आणि आमचा माजी विद्यार्थी श्री. विश्वजीत यादव (Jr. Controller, Cap Gemini Ltd.) या तज्ज्ञांनी सहभाग घेतला. आणि investment banking, equity research, financial accounting, finance & IT for managing business uncertainties इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली. प्रश्नोत्तराच्या फेरीनंतर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

२९.१.२०१३

**Enterpreneurship Day**

**उद्योजकता दिवस**

डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेच्या E-Cell विभागातर्फे दि. २९.१.२०१३ रोजी उद्योजकता दिवस साजरा करण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांमध्ये नव उद्योजक दडलेला असतो, या उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, नव उद्योजकांना उपलब्ध संधींबद्दल माहिती देणे इत्यादी उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. या वर्षीच्या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. के. सूर्यानारायणन, ( संचालक, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स), आणि डॉ. पी. एम. केळकर, (अधिष्ठाता, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स), यांच्या स्वागत पर भाषणाने झाली. यामध्ये त्यांनी नव उद्योजकाची कौशल्ये या विषयावर आपली मते मांडली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. विजय जोशी यांनी यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक असलेल्या उद्योजकाचा स्वतःचा नैसर्गिक कल (Aptitude) तसेच दृष्टिकोन इत्यादी अनेक आवश्यक गुण वैशिष्ट्यांबाबत आपली मते मांडली. दैनंदिन व्यवहारातील अनेक मिश्किल उदाहरणे देऊन, मनोरंजक पद्धतीने त्यांनी आपले व्याख्यान सादर केले.

तसेच गुजराथ राज्य सरकारने उद्योजकांसाठी पुरविलेल्या फायदेशीर योजना आणि संसाधने याबद्दलही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

श्री. जोशी यांच्या मते गुजरात राज्य आता औद्योगिक विकासाचे केंद्र नव उद्योजकांसाठी एक मोक्याचे ठिकाण बनत आहे. त्यामुळे उत्सुक विद्यार्थ्यांनी गुजरातमध्ये आपले उद्योग स्थापनेचे धाडस जरुर करून पाहावे असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

**अतिथी व्याख्यानमाला – सप्टेंबर २०१२**

८.९.२०१२

**विषय : "Excellence in Performance (E/P) : In the context of Globalisation"**

वक्ते: डॉ. के. सूर्यनारायणन, (संचालक, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स)

२२.९.२०१२

**विषय : Winning Behaviours**

वक्ते: श्री. प्रदीप श्रॉफ

**अतिथी व्याख्यानमाला – डिसेंबर २०१२**

२७.१२.२०१२

**विषय : जागतिक भारतीय (Global Indian)**

श्री. रोहित आंबेकर यांनी जागतिक भारतीय या विषयावर बोलतांना जगातील अनेक यशस्वी भारतीयांची उदाहारणे देत या यशा मागची अनेक कारणे विशद केली. त्यांच्या मते ''वसुधैव कुटुंबकम'' ही जी भावना भारतीय संस्कृतीमध्ये आहे आणि हीच भावना कुठेतरी या सर्व यशस्वी भारतीयांमध्ये मुरलेली असल्यामुळेच आज जगात ते यशस्वी होऊ शकले.

त्यांच्या मते भारतातील किंवा इतर राष्ट्रातीलही अनेक लोक खरे तर भारतातील असुविधा, अपुरी साधने, खड्तर जीवन पद्धती यासर्व गोष्टींना सतत नावे ठेवत असतात; परंतु भारतीय लोक हे या सर्व असुविधामधूनही मार्ग काढून जीवन जगत असतात आणि यामुळेच जी एक

प्रकारची कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्याची वृत्ती भारतीयांमध्ये तयार होते ती देखील या यशासाठी कारणीभूत ठरते.

आपल्या व्यवसायानिमित्ताने जगात अनेक ठिकाणी फिरताना लक्षात आलेली अशी अनेक उदाहरणे आणि अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना यावेळी सांगितले.

**अतिथी व्याख्यानमाला – जानेवारी २०१३**

५.१.२०१३

**विषय : शोधनिबंधाचे लिखाण – प्राथमिक / प्रारुप अभ्यास एका माहितीपूर्ण लेखासाठी**

**(Writing a Research Paper - Pilot study to Journal Article)**

Society for Applied Microwave Engineering & Research (SAMEER) माहिती तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार येथील शास्त्रज्ञ डॉ. के. पी. राय आणि सौ. के. निर्मला यांनी वरील विषयावर बोलतांना त्यांच्या संशोधन संस्थेमध्ये तयार करण्यात आलेल्या दोन उपकरणांच्या उदाहरण संदर्भात त्या तंत्रज्ञानाच्या विकासासाठी त्यांनी वापरलेल्या कार्यप्रणाली बद्दल माहिती सांगितली.

संशोधन प्रकल्पाची पहिली पायरी साहित्य शोध व त्यासाठीच्या विविध पद्धती, प्रकल्पाची मांडणी संशोधनातील निष्कर्षाचे सादरीकरण, प्रकल्पाचे सादरीकरण, पेटंट व इतर प्रकाशने इत्यादी बाबतीत ही त्यांनी मार्गदर्शन केले; आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमातील उन्हाळी तसेच अंतिम प्रकल्पांवर विशेष लक्ष दिले पाहिजे असे मत व्यक्त केले.

२.२.२०१३

**विषय : Application of Animation**

Animation Films मधील पत्रांचा लहान मुलांच्या विश्वावरील प्रभाव, मोठ्यांचीही गर्दी खेचणारे Animation चित्रपट, जाहिरात क्षेत्रातही प्रभावी ठरणारे Animation आणि आता शैक्षणिक क्षेत्रातही उपयोगी ठरणारे Animation आणि म्हणूनच Animation या माध्यमाची आवड असणाऱ्यांसाठी आणि उपजीविकेचा मार्ग म्हणून स्वीकारण्याचा विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या माध्यमाची थोडक्यात ओळख करुन देणे या उद्देशाने Application of Animation या विषयावर श्री. समीर सहस्त्रबुद्धे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आल. श्री. समीर सहस्त्रबुद्धे हे IIT मुंबई येथे Animation Project Leader आहेत. त्यांनी आपल्या व्याख्यानात अनेक छोट्याछोट्या Animation Films दाखवून Animation म्हणजे नक्की काय, त्यातील छोटे छोटे बारकावे Animation तयार करण्याची पद्धत, मेहनत इत्यादी सर्व माहिती थोडक्यात पण मनोरंजकपणे विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

●●●

**ऐक्य**

आपल्याला मानवजातीला अशा ठिकाणी न्यायचंय जेथे वेद असणार नाहीत, बायबल असणार नाही आणि कुराणही असणार नाही, पण हे करताना वेद, बायबल व कुराण यांचे ऐक्य असेल.

मानवजातीला हे शिकवले पाहिजे की (अनेक) धर्म हे (एकाच) धर्माचे प्रकटीकरण आहे की जे एकच आहे.

आणि ज्याला जो हवा तो मार्ग निवडता येईल.

स्वामी विवेकानंद
संदर्भ : प्रबुद्ध भारत जानेवारी' २०१३
खंड ११८ क्र.–१

**संकलित**

मनाने जाणूनबुजून केलेले असेल ते पाप.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

(कव्हर २ वरून – **संपादकीय)**

संपूर्णतः भिन्न आहेत. यामुळेच पाश्चात्य आणि भारतीय संस्कृतीतील 'स्वातंत्र्य' आणि 'अधिकारा'च्या संकल्पना 'व्यस्त' आहेत. पाश्चात्त्य संस्कृतीत त्या 'व्यक्ती' आणि 'आत्मकेंद्रित' आहेत तर भारतीय संस्कृतीध्ये त्या व्यक्तीबरोबर 'समाजकेंद्री' आणि समाजमान्य 'चारित्र' चौकटीचे पालन करणाऱ्या आहेत. वसाहतवादाच्या यशाकरता यंत्रसंस्कृतीबरोबरच पाश्चात्त्य नीतिमूल्यांचे रोपणही अपरिहार्य झाले. भ्रष्टाचारापासून सामाजिक बेजबाबदारपणाचे आजचे स्वरूप या विषम संस्कृतींच्या संकराचे फळ आहे. शिक्षण मग ते शालेय असो वा लैंगिक, ते अगदी प्रसार माध्यमांच्या कार्यक्रमाच्या आजच्या स्वरूपापर्यंत सर्व पाश्चात्त्या संस्कृतीची भ्रष्ट नक्कल करुनच मार्गक्रमण करीत आहे.


आज आपण एकच ग्रंथ म्हणजे आपली घटना आपल्या सगळ्या जीवनाला नियंत्रित करण्यासाठी मान्य केली. 'समाजवाद' नावाच्या एका 'वैचारिक' बांडगुळाचा स्वीकार केला. स्त्री पुरुष विषमता, जातधर्म हे आम्ही मानत नाही याचा उठता बसता घोष चालू केला. 'सर्व मानव समान' हे १००% अनैसर्गिक तत्त्व स्वीकारले. अशा या सर्व एकसुरी समाजाच्या निर्मितीकरता आपण मनुस्मृती जाळली, धर्मसंकल्पनेला अंधश्रद्धा ठरवली. हजारो वर्षांच्या संचितातून निर्माण केलेल्या लग्नापासून सर्व सामाजिक संस्था उध्वस्त केल्या; आणि मिळवले काय? तर शुद्ध जातीवर आधारित शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आरक्षणाचा दागिना. या देशातील प्रत्येक समाज 'आम्ही किती मागासलेले आहोत' हे सांगण्यात धन्यता मानत आहे. गरीबाला गरीब राहण्यातच फायदे होत आहेत.

आजच्या आपल्या या भयावह सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अधःपाताची मुळे आपण स्वतःच करून घेतलेल्या या संस्कृतिंभजनात आहेत. मोडतोड म्हणजेच सुधारणा आणि दिवाळखोरीत निघालेल्या साम्य/समाजवादी व्यवस्थेची स्वतःच्या घरात, दारात आणि पक्षात अंमलबजावणी करू न शकणारे 'सुधारक' आणि सिद्धांताला बांधलेले साहित्यिक, नाटककार यांच्याकडेच या भंजनाचा सिंहाचा वाटा जातो. शब्दकोशातील मूर्ख, लाचार, कांगावाखोर, खोटारडा, गुंड, धटिंगण या सगळ्यांचे अर्थ पुढील आवृत्त्यांतून आपल्याला वेगळे दिणार आहेत. बळी तो कान पिळी, चोर तो शिरजोर, आयत्या बिळावर नागोबा अशा म्हणींचे संदर्भ बदलून राजकीय आणि सामाजिक यशाची ती मार्गदर्शक तत्वे ठरणार आहेत. सिनेमात केलेल्या तथाकथित गांधीगीरी करता संजय दत्तला माफी द्या असे सांगणारे आमचे महान निवृत्त न्यायाधीश, सिनेमातून गुन्हेगारीचे काम करणाऱ्या प्राण या नटाला फाशी द्यायला तर सांगतीलच पण त्याच्या प्रेतालाही अनेकदा फाशी द्या, असला सल्लाही त्यांनी दिला तरी नवल वाटायला नको. विधानसभा परिसरात केलेल्या धटिंगणशाहीच्या संदर्भात संपूर्ण मतैक्याने विधानसभा तहकूब करणाऱ्या आजच्या लोकप्रतिनिधींमध्ये सावरकरांचे नाव एखाद्या रस्त्याला द्यायचे असेल तेव्हा मात्र अशी एकजूट झालेली दिसत नाही. एरवी आक्रमक वाघासारखी भूमिका घेऊन मुलाखत घेणारे आमचे आर्णव गोस्वामी आणि थापर हे अत्यंत शालिनतेने विणलेल्या शब्दांतूनच नाही तर देहबोलीतूनही आदर व्यक्त करुन संजय दत्तची मुलाखत घेताना जेव्हा दिसतात तेव्हा वाहिन्यांवरील पेव फुटलेल्या असल्या मुलाखतींचे 'अर्थ' कारणही लक्षात येते. त्यांचा मुलाखत घेतानाचा आविर्भाव असा की ते जणू आइनस्टाईनतूल्य एखाद्या शास्त्रज्ञाची किंवा कारगील युद्धात पराक्रम गाजवणाऱ्या योध्याचीच मुलाखत घेत आहेत. मनोरंजनाच्या माध्यमातून आणि मुलाखतीतून प्रसारित केला जाणारा हा स–माजवादच आजच्या आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अधःपतनाला कारणीभूत आहे.

म्हणूनच परिस्थितीत बदल करायचा असेल तर या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना किंवा मारझोडीचे उघडपणे समर्थन करणाऱ्या पक्षांना भरघोसपणे निवडून देणाऱ्या किंवा त्यांच्या सभांना गर्दी करणाऱ्या सामान्य माणसांनी अंतर्मुख होऊन याचा विचार करायला हवा.

**डॉ. विजय बेडेकर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.